भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२

(१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३)

[ १ मे, १९७९ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Wild Life (Protection) Act, 1972

**( Act No. 53 of 1972 )**

[ *As in force on the 1st May, 1979* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीनें मुद्रित व प्रकाशित केले.

(१९८०)

[ किंमत—रु. १.६० ]

# वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२

## कलमांचा क्रम


प्रकरण १ ले

प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण २ रे

अधिनियमान्वये नियुक्त किंवा घटित करावयाची प्राधिकरणे

३. संचालक व इतर अधिकारी यांची नियुक्ती.

४. मुख्य वन्य जीव रक्षक आणि इतर अधिकारी यांची नियुक्ती.

५. प्रत्यायोजन करण्याची शक्ती.

६. वन्य जीव सल्लागार मंडळाची घटना.

७. मंडळाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

८. वन्य जीव सल्लागार मंडळाची कर्तव्ये.

प्रकरण ३ रे

वन्य प्राण्यांची मृगया

९. वन्य प्राण्यांची मृगया.

१०. हत्या केलेल्या किंवा पकडलेल्या वन्य प्राण्यांची नोंद ठेवणे.

११. विवक्षित प्रकरणीं वन्य प्राण्यांच्या मृगयेस परवानगी देणे.

१२. विशेष प्रयोजनांसाठी परवाना मंजूर करणे.

१३. लायसन निलंबित किंवा रद्द करणे.

१४. अपिले.

१५. वन्य प्राण्याच्या पिलांची व माद्यांची मृगया.

१६. बंद हंगाम घोषित करणे.

१७. मृगयेवरील निर्बंध.

प्रकरण ४ थे

अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, राखीव मृगयाक्षेत्रे व बंद क्षेत्रे

१८. अभयारण्ये घोषित करणे.

१९. जिल्हाधिकाऱ्याने अधिकार ठरवणे.

२०. अधिकार उपार्जित होण्यास आडकाठी.

२१. जिल्हाधिकाऱ्याकडून उद्घोषणा.

२२. जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी.

२३. जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती.

२४. अधिकार संपादन.

२५. संपादन कार्यवाही.

२६. जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचे प्रत्यायोजन.

२७. अभयारण्यात प्रवेश करण्यावर निर्बंध.

कलमे

२८. परवाना मंजूर करणे.

२९. परवान्याशिवाय अभयारण्यात मृगया करण्यास बंदी.

३०. आग लावण्यास बंदी.

३१. अभयारण्यात हत्यारासह प्रवेश करण्यास बंदी.

३२. क्षतिकारक पदार्थांचा वापर करण्यास मनाई.

३३. अभयारण्यांचे नियंत्रण.

३४. शस्त्रे बाळगणाऱ्या विवक्षित व्यक्तींची नोंदणी.

**राष्ट्रीय उद्याने**

३५. राष्ट्रीय उद्याने घोषित करणे.

**राखीव मृगयाक्षेत्र**

३६. राखीव मृगयाक्षेत्र घोषित करणे.

**बंद क्षेत्र**

३७. बंद क्षेत्र घोषित करणे.

**केंद्र शासनाने घोषित केलेली अभयारण्ये अथवा राष्ट्रीय उद्यान**

३८. क्षेत्रे ही अभयारण्ये किंवा राष्ट्रीय उद्याने म्हणून घोषित करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

## प्रकरण ५ वे

**वन्य प्राणी, प्राणिजन्य वस्तू आणि शिकारस्मारके यांचा व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार**

३९. वन्य प्राणी, वगैरे शासनाची मालमत्ता असणे.

४०. अधिकथने.

४१. चौकशी करणे व जंत्री तयार करणे.

४२. मालकी प्रमाणपत्र.

४३. प्राण्याचे हस्तांतरण, इत्यादींचे विनियमन.

४४. लायसनाशिवाय शिकारस्मारकांचा किंवा प्राणिजन्य वस्तूंचा व्यापार करण्यास बंदी.

४५. लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे.

४६. अपील.

४७. नोंदी ठेवणे.

४८. लायसनधारकाने प्राणी खरेदी करणे, इत्यादी.

४९. लायसनधारकाहून अन्य व्यक्तीने बंदिस्त प्राणी खरेदी करणे, इत्यादी.

## प्रकरण ६ वे

**गुन्ह्यांस प्रतिबंध व त्यांचा तलास**

५०. प्रवेश करण्याची, झडती घेण्याची, अटक करण्याची व स्थानबद्ध करण्याची शक्ती.

५१. दंड.

५२. प्रयत्न व अपप्रेरण.

५३. अभिग्रहणाबद्दल शिक्षा.

५४. गुन्हे आपसात मिटवण्याची शक्ती.

५५. गुन्ह्यांची दखल घेणे.

५६. इतर कायद्यांच्या प्रवर्तनास आडकाठी नाही.

५७. विवक्षित प्रकरणीं गृहीत धरावयाची गोष्ट.

५८. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

**कलमे**

५९. अधिकारी हे लोकसेवक असणे.

६०. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

६१. अनुसूचीतील नोंदी बदलण्याची शक्ती.

६२. विवक्षित वन्य प्राणी हे उपद्रवी जीव असल्याचे घोषित करणे.

६३. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

६४. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

६५. अनुसूचित जनजातींच्या अधिकारांचे संरक्षण करणे.

६६. निरसने व व्यावृत्ती.

अनुसूची १ ली.

अनुसूची २ री.

अनुसूची ३ री.

अनुसूची ४ थी.

अनुसूची ५ वी.

# वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२

## (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३)[1]

[ ९ सप्टेंबर, १९७२ ]

**वन्य प्राणी व पक्षी यांच्या संरक्षणाला आणि त्याच्याशी निगडित किंवा त्याला साहाय्यभूत किंवा तदानुषंगिक अशा बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वन्य प्राणी व पक्षी यांच्या संरक्षणाचा आणि त्याच्याशी निगडित किंवा त्याला साहाय्यभूत किंवा तदानुषंगिक अशा बाबींचा उपबंध करणे समयोचित आहे;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाच्या अनुच्छेद २४९ व २५० मध्ये उपबंधित केल्या आहेत तेवढ्या बाबी खेरीजकरून, पूर्वोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबीच्या संबंधात संसदेस राज्यांसाठी कायदे करण्याची शक्ती नाही;

**आणि ज्याअर्थी,** संविधानाचा अनुच्छेद २५२-खंड (१) याला अनुसरून आंध्र प्रदेश, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, मणिपूर, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांच्या विधानमंडळांच्या दोन्ही सभागृहांनी, त्या राज्यांत पूर्वोक्त बाबी संसदेने कायद्याद्वारे विनियमित कराव्यात अशा आशयाचे ठराव पारित केलेले आहेत;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास 'वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार प्रथमतः आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, मणिपूर, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या संपूर्ण राज्यांवर व सर्व संघ राज्यक्षेत्रांवर आहे; आणि संविधानाचा अनुच्छेद २५२-खंड (१) याला अनुसरून या संबंधात पारित केलेल्या ठरावाद्वारे जे राज्य हा अधिनियम अंगीकारील अशा अन्य राज्यावरही त्याचा विस्तार राहील.

---

१. हा अधिनियम पुढीलप्रमाणे अंमलात आला :—

मध्यप्रदेशात दिनांक २५ जानेवारी, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर.२८ (इ), दिनांक २५ जानेवारी, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ७३.

बिहारमध्ये दिनांक १ फेब्रुवारी, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४० (इ), दिनांक १ फेब्रुवारी, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ९९.

गुजरातमध्ये दिनांक १ फेब्रुवारी, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ४२ (इ), दिनांक १ फेब्रुवारी, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ १०३.

उत्तर प्रदेशात दिनांक १ फेब्रुवारी, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ४४ (इ), दिनांक १ फेब्रुवारी, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ १०६.

हरयाणामध्ये दिनांक १२ मार्च, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ६३ (इ), दिनांक १२ मार्च, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ४३१.

हिमाचल प्रदेशात दिनांक २ एप्रिल, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. १९० (इ), दिनांक २ एप्रिल, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ५१७.

पश्चिम बंगालमध्ये दिनांक १ मे, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. २२४ (इ), दिनांक १ मे, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ६१३.

मणिपूरमध्ये दिनांक १५ मे, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. २६९ (इ), दिनांक १५ मे, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ७४५.

अरुणाचल प्रदेशात दिनांक १५ मे, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. २७२ (इ), दिनांक १५ मे, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ७६५.

(३) ज्यावर या अधिनियमाचा विस्तार आहे किंवा भविष्यकाळात विस्तार करण्यात येईल त्या राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात तो, केंद्र शासन अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [1]दिनांकास अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी अथवा वेगवेगळ्या राज्यांसाठी किंवा संघ राज्यक्षेत्रांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(१) "प्राणी" यात उभयचर प्राणी, पक्षी, सस्तन प्राणी व सरपटणारे प्राणी आणि त्यांची पिले यांचा समावेश आहे, तसेच त्यात, पक्ष्यांच्या व सरपटणाऱ्या प्राण्यांच्या बाबतीत त्यांची अंडी यांचाही समावेश आहे;

(२) "प्राणिजन्य वस्तू" याचा अर्थ, उपद्रवी जीवांहून अन्य कोणत्याही बंदिस्त किंवा वन्य प्राण्यापासून तयार केलेली वस्तू असा आहे आणि ज्यामध्ये अशा संपूर्ण प्राण्याचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा उपयोग करण्यात आला असेल ती वस्तू किंवा तो पदार्थ यांचा त्यात समावेश आहे;

(३) "मोठी शिकार" याचा अर्थ, ३ ऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी असा आहे;

(४) "मंडळ" याचा अर्थ, कलम ६-पोटकलम (१) अन्वये घटित केलेले 'वन्य जीव सल्लागार मंडळ' असा आहे;

(५) "बंदिस्त प्राणी" याचा अर्थ, अनुसूची १ ली, अनुसूची २ री, अनुसूची ३ री, किंवा अनुसूची ४ थी यांमध्ये विनिर्दिष्ट केलेला जो कोणताही प्राणी पकडलेला, बंदिस्त अवस्थेत ठेवलेला किंवा तशा अवस्थेत वाढवलेला असेल तो प्राणी असा आहे;

(६) "गुरेढोरे" यात रेडे-म्हशी, वळू, बैल, उंट, गाई, पाळीव हत्ती, गाढवे, शेळ्या, घोडे, खेचरे, डुकरे, आणि मेंढ्या यांचा समावेश आहे आणि त्यांच्या बछड्यांचाही समावेश आहे;

(७) "मुख्य वन्य जीव रक्षक" याचा अर्थ, कलम ४-पोटकलम (१)-खंड (क) अन्वये तशी नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे;

(८) "बंद क्षेत्र" याचा अर्थ, कलम ३७-पोटकलम (१) खाली जे शिकारीला बंद म्हणून जाहीर केलेले आहे ते क्षेत्र असा आहे;

(९) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, जिल्ह्याच्या महसुली प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी असा आहे;

(१०) "अधिनियमाचा प्रारंभ" याचा—

(क) राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात या अधिनियमाचा प्रारंभ असा आहे;

(ख) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या संबंधातील अर्थ, संबंधित राज्यात त्या उपबंधाचा प्रारंभ असा आहे;

(११) "व्यापारी" याचा अर्थ, जी व्यक्ती कोणताही बंदिस्त प्राणी, प्राणिजन्य वस्तू शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती याच्या खरेदी-विक्रीचा धंदा चालवते अशी कोणतीही व्यक्ती असा आहे;

(१२) "संचालक" याचा अर्थ, कलम ३-पोटकलम (१)-खंड (क) खाली 'वन्य जीव रक्षण संचालक' म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे;

(१३) "राखीव मृगयाक्षेत्र" याचा अर्थ, कलम ३६ खाली मृगयेसाठी राखीव म्हणून घोषित केलेले क्षेत्र असा आहे;

(१४) "शासकीय मालमत्ता" याचा अर्थ, कलम ३९ मध्ये निर्देशिलेली कोणतीही मालमत्ता असा आहे;

(१५) "निसर्गनिवास" यात कोणत्याही वन्य प्राण्याचे नैसर्गिक वसतिस्थान म्हणून असलेली जमीन, पाणी किंवा झाडझाडोरा याचा समावेश आहे;

---

[1] केरळमध्ये दिनांक १ जून, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. २९३ (इ), दिनांक १ जून, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ८४७.

महाराष्ट्रात दिनांक १ जून, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. २९६ (इ), दिनांक १ जून, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ८६७.

दिल्लीमध्ये दिनांक १ जून, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. २९९ (इ), दिनांक १ जून, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ८८६.

त्रिपुरामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, १९७३ रोजी—पहा, अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ४६५ (इ), दिनांक २ ऑक्टोबर, १९७३, भारताचे राजपत्र, असाधारण—भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ १४५९.

(१६) "मृगया" याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे---

(क) कोणत्याही वन्य प्राण्याला पकडणे, ठार मारणे, विष घालणे, फासात पकडणे आणि सापळ्यात पकडणे आणि तसे करण्याचा कोणताही प्रयत्न करणे;

(ख) उपखंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनार्थ कोणत्याही वन्य प्राण्यास हाकारणे;

(ग) अशा कोणत्याही प्राण्याला इजा करणे, तो नष्ट करणे किंवा त्याच्या शरीराचा कोणताही भाग काढून घेणे अथवा वन्य पक्ष्यांच्या किंवा सरपटणाऱ्या प्राण्यांच्या बाबतीत, अशा पक्ष्यांच्या किंवा सरपटणाऱ्या प्राण्यांच्या अंड्यांची खराबी करणे, अशा पक्ष्यांची किंवा सरपटणाऱ्या प्राण्यांची अंडी किंवा घरटी विस्कटवणे;

(१७) "जमीन" यात कालवे, खाड्या किंवा इतर जलमार्ग, जलाशय, नद्या, प्रवाह व तलाव-- मग ते कृत्रिम असोत वा नैसर्गिक असोत--यांचा समावेश आहे आणि त्यात गोटे व खडक यांचाही समावेश आहे;

(१८) "लायसन" याचा अर्थ, या अधिनियमाखाली मंजूर केलेले लायसन असा आहे;

(१९) "निर्माता" याचा अर्थ, प्राणिजन्य वस्तू तयार करणारा असा आहे;

(२०) "मागुती" यात उपद्रवी जीव सोडून इतर कोणत्याही वन्य प्राण्याचे रक्त, हाडे, कंडरा, अंडी, चरबी आणि मांस--मग ते कच्चे असो वा शिजविलेले असो--यांचा समावेश आहे;

(२१) "राष्ट्रीय उद्यान" याचा अर्थ, कलम ३५ किंवा कलम ३८ अन्वये 'राष्ट्रीय उद्यान' म्हणून घोषित केलेले अथवा तसे घोषित केले असल्याचे कलम ६६-पोटकलम (३) अन्वये मानले गेलेले कोणतेही क्षेत्र असा आहे;

(२२) "अधिसूचना" याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना असा आहे;

(२३) "परवाना" याचा अर्थ, ह्या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये मंजूर केलेला परवाना असा आहे;

(२४) "व्यक्ती" यामध्ये पेढीचा समावेश आहे;

(२५) "विहित" याचा अर्थ, ह्या अधिनियमाखाली केलेल्या नियमांन्वये विहित केलेले असा आहे;

(२६) "अभयारण्य" याचा अर्थ, कलम १८ किंवा कलम ३८ अन्वये 'वन्य जीव अभयारण्य' म्हणून घोषित केलेले अथवा तसे घोषित केले असल्याचे कलम ६६-पोटकलम (३) अन्वये मानले गेलेले कोणतेही क्षेत्र असा आहे;

(२७) "लहान शिकार" याचा अर्थ, ४ थ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी असा आहे;

(२८) "विशेष शिकार" याचा अर्थ, २ ऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी असा आहे;

(२९) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतीने नियुक्त केलेला त्या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक असा आहे;

(३०) "चर्मपूरण" याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्याचा अर्थ, शिकारस्मारके प्रसाधित करणे, त्यांची कमाविशी करणे किंवा ती जतन करून ठेवणे असा आहे;

(३१) "शिकारस्मारक" याचा अर्थ, कोणत्याही नैसर्गिक किंवा कृत्रिम साधनांनी राखलेला किंवा जतन करून ठेवलेला उपद्रवी जीवांहून अन्य असा कोणताही सबंध बंदिस्त प्राणी किंवा वन्य प्राणी किंवा त्याचा कोणताही अवयव असा आहे; आणि त्यात,---

(क) चर्मपूरणाच्या प्रक्रियेने संपूर्णतः किंवा अंशतः बैठकीवर बसवलेली अशा प्राण्यांची बुरणुसे, कातडी व नमुने, आणि

(ख) भारशिंग, शिंग, गेंड्याचे शिंग, केस, पीस, नख, दात, कस्तुरी, अंडी व घरटी यांचा समावेश आहे;

(३२) "अप्रसाधित शिकारस्मारक" याचा अर्थ, उपद्रवी जीव सोडून अन्य असा चर्मपूरण प्रक्रिया न केलेला कोणताही बंदिस्त किंवा वन्य प्राणी अथवा त्याचा कोणताही भाग असा आहे, आणि यात नुकतीच हत्या केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याचा समावेश आहे;

(३३) "वाहन" याचा अर्थ, जमिनीवरून, पाण्यावरून किंवा हवेतून संचार करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही यान असा आहे, आणि यात रेडा-म्हैस, बळू, बैल, उंट, गाढव, हत्ती, घोडा आणि खेचर यांचा समावेश आहे;

(३४) "उपद्रवी जीव" याचा अर्थ, ५ व्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही वन्य प्राणी असा आहे;

(३५) "हत्यार" यात दारूगोळा, धनुष्य-बाण, स्फोटक द्रव्ये, हत्यारे, अग्निशस्त्रे, गळ, सुऱ्या, जाळी, विष, फासे, सापळे आणि प्राण्याला बधिर करण्याची, फशी पाडण्याची, नष्ट करण्याची, जखमी करण्याची किंवा त्याची हत्या करण्याची क्षमता असलेले कोणतेही साधन किंवा अवजार यांचा समावेश आहे;

(३६) "वन्य प्राणी" याचा अर्थ, निसर्गतः रानटी अवस्थेत आढळणारा कोणताही प्राणी असा आहे आणि यात अनुसूची १ ली, अनुसूची २ री, अनुसूची ३री, अनुसूची ४ थी किंवा अनुसूची ५ वी हीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्राण्याचा---मग तो कोठेही आढळो---समावेश आहे;

(३७) "वन्य जीव" यात कोणताही प्राणी, मधमाशा, फुलपाखरे, कवचधारी प्राणी, मासे आणि पतंग यांचा आणि कोणत्याही निसर्गनिवासाचा भाग असलेली जलीय किंवा स्थलीय वनस्पती यांचा समावेश होतो;

(३८) "वन्य जीव रक्षक" याचा अर्थ, कलम ४--पोटकलम (१)--खंड (ख्) अन्वये तशी नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे.

---

## प्रकरण २ रे

### अधिनियमान्वये नियुक्त किंवा घटित करावयाची प्राधिकरणे

*संचालक व इतर अधिकारी यांची नियुक्ती.*

३. (१) केंद्र शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी,---

(क्) एक वन्य जीव रक्षण संचालक;

(ख्) सहायक वन्य जीव रक्षण संचालक; आणि

(ग्) आवश्यक असतील असे इतर अधिकारी आणि कर्मचारी

नियुक्त करता येतील.

(२) संचालकाला या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तो आपली कर्तव्ये पार पाडत असताना व आपल्या शक्तींचा वापर करत असताना, केंद्र शासन वेळोवेळी जे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देईल त्यांस अधीन राहावे लागेल.

(३) या कलमाखाली नियुक्त केलेले सहायक वन्य जीव रक्षण संचालक आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे संचालकास दुय्यम असतील.

*मुख्य वन्य जीव रक्षक आणि इतर अधिकारी यांची नियुक्ती.*

४. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनास,---

(क्) एक मुख्य वन्य जीव रक्षक;

(ख्) वन्य जीव रक्षक; आणि

(ग्) आवश्यक असतील असे इतर अधिकारी व कर्मचारी

नियुक्त करता येतील.

(२) मुख्य वन्य जीव रक्षकाला या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तो आपली कर्तव्ये पार पाडत असताना व आपल्या शक्तींचा वापर करत असताना, राज्य शासन वेळोवेळी जे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देईल त्यांस अधीन राहावे लागेल.

(३) या कलमाखाली नियुक्त केलेला वन्य जीव रक्षक आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे मुख्य वन्य जीव रक्षकास दुय्यम असतील.

*प्रत्यायोजन करण्याची शक्ती.*

५. (१) केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने संचालकास लेखी आदेशाद्वारे, ह्या अधिनियमाखालील आपल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती किंवा कर्तव्ये आपणांस दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे, आदेशात विनिर्दिष्ट केल्या असतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, प्रत्यायोजित करता येतील.

(२) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने मुख्य वन्य जीव रक्षकास लेखी आदेशाद्वारे, कलम ११--पोटकलम (१)--खंड (क्) खेरीजकरून या अधिनियमाखालील आपल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती किंवा कर्तव्ये आपणांस दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे, आदेशात विनिर्दिष्ट केल्या असतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, प्रत्यायोजित करता येतील.

(३) संचालक किंवा मुख्य वन्य जीव रक्षक याने जो कोणताही सर्वसाधारण किंवा विशेष निदेश दिला असेल किंवा शर्त लादली असेल तिच्या अधीनतेने, संचालकाने किंवा मुख्य वन्य जीव रक्षकाने कोणत्याही शक्तीचा वापर करण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जणू काही अशा शक्ती त्या व्यक्तीला प्रत्यायोजनाद्वारे नव्हेत तर या अधिनियमाद्वारे प्रत्यक्षपणे प्रदान केलेल्या असाव्यात असे समजून अशा शक्ती तशाच रीतीने व तितक्याच परिणामकारकपणे वापरता येतील.

६. (१) राज्य शासन किंवा संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत त्याचा प्रशासक, या अधिनियमाच्या प्रारंभा-नंतर होईल तितक्या लवकर, पुढील सदस्य मिळून बनलेले 'वन्य जीव सल्लागार मंडळ' घटित करील, ते असे :— वन्य जीव सल्लागार मंडळाची घटना.

(क) राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील वनाचा प्रभारी मंत्री अथवा जर असा मंत्री नसेल तर राज्य शासनाचा मुख्य सचिव किंवा, प्रकरणपरत्वे, संघ राज्यक्षेत्र शासनाचा मुख्य सचिव—हा सल्लागार मंडळाचा अध्यक्ष राहील;

(ख) राज्य विधानमंडळाचे दोन सदस्य अथवा, प्रकरणपरत्वे, विधानमंडळ असलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत अशा विधानमंडळाचे दोन सदस्य;

(ग) वनांचा प्रभारी असलेला राज्य शासनाचा किंवा संघ राज्यक्षेत्राचा सचिव;

(घ) मुख्य वन संरक्षक, पदसिद्ध;

(ङ) संचालकाने नामनियुक्त करावयाचा एक अधिकारी;

(च) मुख्य वन्य जीव रक्षक, पदसिद्ध;

(छ) राज्य शासनाच्या मते ज्यांना वन्य जीवांच्या रक्षणाविषयी आस्था आहे असे जास्तीत जास्त पंधरा इतर अधिकारी व अशासकीय सदस्य.

(२) राज्य शासन मुख्य वन संरक्षकास किंवा मुख्य वन्य जीव रक्षकास मंडळाचा सचिव म्हणून नियुक्त करील.

(३) पोटकलम (१)-खंड (छ) मध्ये निर्देशिलेल्या मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्यातील रिक्त जागा भरण्याची रीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) सदस्यांना आपली कर्तव्ये पार पाडताना जो खर्च येईल त्याबाबत राज्य शासन विहित करील असे भत्ते मिळण्यास ते हक्कदार असतील.

७. (१) राज्य शासन निदेश देईल अशा ठिकाणी मंडळ वर्षातून निदान दोन वेळा सभा भरवील. मंडळाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

(२) मंडळ स्वतः अनुसरावयाच्या कार्यपध्दतीचे (गणसंख्या धरून) विनियमन करील.

(३) त्या त्या प्रकरणाच्या गुणवत्तेला बाधक होत नसेल तर, केवळ मंडळात एखादी रिक्त जागा आहे किंवा त्याच्या घडणीत एखादी उणीव आहे किंवा त्याच्या कार्यपध्दतीत एखादी नियमबाह्य गोष्ट झाली आहे एवढयाच कारणाने मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य होणार नाही.

८. राज्य शासनास पुढील बाबतींत सल्ला देणे हे वन्य जीव सल्लागार मंडळाचे कर्तव्य असेल,— वन्य जीव सल्लागार मंडळाची कर्तव्ये.

(क) अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, राखीव मृगया क्षेत्रे आणि बंद क्षेत्रे म्हणून घोषित करावयाच्या क्षेत्रांची निवड आणि अशा क्षेत्रांचे प्रशासन यांविषयी;

(ख) या अधिनियमान्वये लायसने व परवाने मंजूर करण्याचे धोरण आखण्याविषयी;

(ग) कोणत्याही अनुसूचीचे विशोधन करण्यासंबंधीच्या कोणत्याही बाबीविषयी;

(घ) वन्य जीवांचे रक्षण करण्याशी निगडित अशी जी अन्य कोणतीही बाब राज्य शासन त्याच्याकडे निर्देशित करील तीविषयी.

## प्रकरण ३ रे

### वन्य प्राण्यांची मृगया

९. (१) कोणत्याही व्यक्तीला १ ल्या अनुसूची मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही. वन्य प्राण्यांची मृगया.

(२) कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (५) अन्वये दिल्या जाणाऱ्या लायसनामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींवर व त्यांना अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, अनुसूची २ री, अनुसूची ३ री व अनुसूची ४ थी यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेले लायसन मिळवू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे (यात यापुढे 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून निर्दिष्ट) विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशी फी भरून अर्ज करावा लागेल.

(४) पोटकलम (३) खालील अर्ज, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रकारच्या लायसना-साठी करता येईल ती अशी :—

(क) विशेष शिकार मृगया लायसन.

(ख) मोठी शिकार मृगया लायसन.

(ग) लहान शिकार मृगया लायसन.

(घ) वन्य प्राण्यास सापळयात पकडण्यासाठी लायसन :

परंतु, असे कोणतेही लायसन त्यात विनिर्दिष्ट केले जाईल अशा प्राण्याची मृगया करण्यापुरतेच किंवा त्यास सापळयात पकडण्यापुरतेच मर्यादित ठेवता येईल.

(५) पोटकलम (३) खालील अर्ज मिळाल्यावर मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी अर्जदाराची लायसन मिळण्याची योग्यता आहे किंवा कसे याविषयी आपणांस योग्य वाटेल अशी चौकशी करून नंतर असे लायसन मंजूर करण्याबद्दलची किंवा मंजूर करण्यास नकार देण्याबद्दलची आपली कारणे नमूद करून अशी मंजुरी किंवा नकार देऊ शकेल आणि लायसन मंजूर करण्यास नकार दिला जाईल तेव्हा लायसनासाठी भरलेली फी अर्जदारास परत करण्यात येईल.

(६) या कलमान्वये मंजूर केलेले लायसन—

(क) विहित असेल अशा नमुन्यात राहील;

(ख) त्यात विनिर्दिष्ट असेल अशा कालावधीपुरते विधिग्राह्य राहील;

(ग) विहित असेल अशा अटींस, शर्तींस व निर्बंधांस अधीन राहील;

(घ) हस्तांतरणीय असणार नाही.

**हत्या केलेल्या किंवा पकडलेल्या वन्य प्राण्यांची नोंद ठेवणे.**

१०. (१) प्रत्येक लायसनधारकाला लायसन चालू असताना हत्या केलेले किंवा पकडलेले असे, उपद्रवी जीवांहून इतर वन्य प्राणी यांचा विहित असेल असा तपशील अंतर्भूत असलेली नोंद ठेवावी लागेल.

(२) जेव्हा एखादा लायसनधारक अनुसूची २ री किंवा अनुसूची ३ री यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्राण्याची हत्या करील, त्यास जखमी करील किंवा पकडील तेव्हा, याप्रमाणे हत्या केल्याच्या, जखमी केल्याच्या किंवा पकडल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांहून उशिराचा नव्हे अशा दिवशी अथवा जर त्याआधी तो लायसनामध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र सोडून गेला तर तत्पूर्वी त्याला, याप्रमाणे त्याने हत्या केलेल्या, जखमी केलेल्या किंवा पकडलेल्या प्राण्याबाबत मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे विहित तपशील देणारी लेखी सूचना पाठवावी लागेल.

(३) प्रत्येक लायसनधारकाला पोटकलम (१) अन्वये त्याने ठेवलेली नोंद आणि लायसन, अशा लायसनाच्या समाप्तीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांहून उशिराचा नव्हे अशा दिवशी मुख्य वन्य जीव रक्षकाच्या किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करावी लागेल आणि पोटकलम (१) अन्वये आपण ठेवलेली नोंद बिनचूक असल्याचे प्रमाणित करून विहित नमुन्यांतील अधिकथन स्वाक्षरित करावे लागेल.

**विवक्षित प्रकरणीं वन्य प्राण्यांच्या मृगयेस परवानगी देणें.**

११. (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी आणि ४ थ्या प्रकरणाच्या उपबंधांच्या अधीनतेने,—

(क) जर १ ल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला एखादा वन्य प्राणी मानवी जीवितास धोकादायक झाला आहे किंवा तो बरा होऊ न शकण्याइतपत विकलांग व व्याधिग्रस्त झाला आहे याबाबत स्वतःची खात्री झाली तर, मुख्य वन्य जीव रक्षक लेखी आदेशाद्वारे त्याबद्दलची कारणे नमूद करून कोणत्याही व्यक्तीस अशा प्राण्याची मृगया करण्याची परवानगी देऊ शकेल किंवा अशा प्राण्याची मृगया करवू शकेल;

(ख) जर अनुसूची २ री, अनुसूची ३ री किंवा अनुसूची ४ थी यामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही वन्य प्राणी मानवी जीवितास किंवा मालमत्तेस (कोणत्याही जमिनीवरील उभी पिके धरून) धोकादायक झाला आहे किंवा तो बरा न होऊ शकण्याइतपत विकलांग व व्याधिग्रस्त झाला आहे याबाबत स्वतःची खात्री झाली तर, मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी लेखी आदेशाद्वारे त्याबद्दलची कारणे नमूद करून कोणत्याही व्यक्तीस अशा प्राण्याची मृगया करण्याची परवानगी देऊ शकेल किंवा अशा प्राण्याची मृगया करवू शकेल.

(२) स्वसंरक्षण किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचे संरक्षण करावे या सद्हेतूने कोणत्याही वन्य प्राण्याची हत्या करणे किंवा त्यास जखमी करणे हा गुन्हा ठरणार नाही :

परंतु, जर कोणतीही व्यक्ती असे संरक्षण आवश्यक झाले त्यावेळी या अधिनियमातील अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमातील किंवा आदेशातील कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण करून कोणतेही कृत्य करीत असेल तर, ती या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे निर्दोष ठरणार नाही.

(३) कोणत्याही व्यक्तीच्या संरक्षणार्थ हत्या केलेला किंवा जखमी केलेला कोणताही वन्य प्राणी ही शासनाची मालमत्ता राहील.

**विशेष प्रयोजनांसाठी परवाना मंजूर करणे.**

१२. ज्या परवान्यामुळे, —

(क) शिक्षण ;

(ख) शास्त्रीय संशोधन; किंवा

(ग) प्राणिशास्त्रीय उद्याने, संग्रहालये व तत्सम संस्था यांसाठी नमुन्यांचा संग्रह करणे;

यांसाठी अशा परवान्यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याची, त्यात विनिर्दिष्ट असतील अशा शर्तींच्या अधीनतेने शिकार करण्यास अशा परवान्याचा धारक हक्कदार होईल असा परवाना राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने कोणाही व्यक्तीला, विहित असेल अशी फी भरण्यात आल्यावर मुख्य वन्य जीव रक्षकाने त्याबद्दलची कारणे नमूद करून लेखी आदेशाद्वारे मंजूर करणे हे, या अधिनियमात इतरत्र काहीही अंतर्भूत असले तरी, कायदेशीर होईल.

१३. मुख्य वन्य जीव रक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीनतेने सुयोग्य व पुरेशा कारणास्तव---ते कारण लेखी नमूद करून---ह्या प्रकरणाखाली मंजूर केलेले कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल: लायसन निलंबित किंवा रद्द करणे.

परंतु, लायसनधारकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज ते याप्रमाणे निलंबित किंवा रद्द केले जाणार नाही.

१४. (१) कलम ९ खालील लायसन मंजूर करण्यास नकार देणाऱ्या आदेशावर, किंवा कलम १३ खालील लायसन निलंबित किंवा रद्द करणाऱ्या आदेशावर--- अपिले.

(क) जर तो आदेश प्राधिकृत अधिकाऱ्याने दिला असेल तर, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा;

(ख) जर तो आदेश मुख्य वन्य जीव रक्षकाने दिला असेल तर, राज्य शासनाकडे,

अपील होऊ शकेल.

(२) पोटकलम (१) खाली मुख्य वन्य जीव रक्षकाने अपीलान्ती दिलेल्या आदेशांच्या बाबतीत दुसरे अपील राज्य शासनाकडे होऊ शकेल.

(३) पूर्वोक्ताच्या अधीनतेने ह्या कलमाखाली अपीलान्ती दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल.

(४) ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे तो अर्जदारास कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात आल्याशिवाय ते विचारार्थ स्वीकारले जाणार नाही:

परंतु, जर अपील वेळीच दाखल न करण्यामागे अपीलकर्त्याला पुरेसे कारण होते याबाबत अपील प्राधिकरणाची खात्री झाली तर, त्यास पूर्वोक्त कालावधी संपल्यानंतरही एखादे अपील स्वीकारता येईल.

१५. लायसनाद्वारे विशेषेकरून प्राधिकृत केलेले असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला उपद्रवी जीवांहून अन्य कोणत्याही वन्य प्राण्याच्या पिलाची अथवा कोणत्याही अशा प्राण्याच्या मादीची किंवा कोवळी भारशिंगे असलेल्या हरणाची मृगया करता येणार नाही. वन्य प्राण्याच्या पिलांची व मादांची मृगया.

१६. (१) राज्य शासनास अधिसूचनेद्वारे, सबंध राज्यभर किंवा त्याच्या कोणत्याही भागात, सबंध वर्ष किंवा त्याचा कोणताही भाग, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही वन्य प्राण्यापुरता बंद हंगाम म्हणून घोषित करता येईल आणि उक्त कालावधीत अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रात अशा प्राण्याच्या मृगयेस परवानगी दिली जाणार नाही. बंद हंगाम घोषित करणे.

(२) पोटकलम (१) चे उपबंध राज्य शासनाने यासंबंधात अन्यथा विनिर्दिष्ट केले नसेल तर उपद्रवी जीवांच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

१७. (१) कोणत्याही व्यक्तीला,--- मृगयेवरील निर्बंध.

(क) पाण्यावर किंवा जमिनीवर चालणाऱ्या अशा, चाके असलेल्या किंवा यंत्रचलित वाहनातून किंवा त्याच्या साहाय्याने अथवा वायुयानाच्या साहाय्याने कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही;

(ख) कोणताही वन्य प्राणी हाकारण्यासाठी किंवा त्याची दाणादाण उडवण्यासाठी वायुयानाचा, मोटार वाहनाचा किंवा मोटार लाँचचा वापर करता येणार नाही;

(ग) वन्य प्राण्यास सापळयात पकडण्यासाठी दिलेल्या लायसनान्वये वन्य प्राणी पकडण्याशी जेवढी संबंधित असतील तेवढी खेरीजकरून रसायने, स्फोटक द्रव्ये, जाळी, चोरखड्डे, विष, विषाने माखलेली हत्यारे, फास किंवा सापळे यांच्या साहाय्याने कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही;

(घ) लायसनान्वये एकेरी छऱ्याच्या गोळीचा वापर केलेल्या हलक्या बंदुकीने शिकार करण्यासाठी विशेषेकरून प्राधिकृत केले नसल्यास रायफलहून अन्य कोणत्याही साधनाने विशेष शिकारीची किंवा मोठया शिकारीची मृगया करता येणार नाही;

(ङ) मृगयेच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही वनस्पतींना आग लावता येणार नाही;

(च) भक्ष्यावर असलेल्या मांसभक्षी प्राण्यांच्या बाबतीत लायसनान्वये मृगयेसाठी कोणत्याही कृत्रिम प्रकाशाचा वापर करण्यास विशेषेकरून प्राधिकृत केलेले असल्यास तेवढे खेरीजकरून एरव्ही, तसे करता येणार नाही;

(छ) भक्ष्यावर असलेल्या मांसभक्षी प्राण्यांच्या बाबतीत, लायसनान्वये रात्रीच्या वेळात म्हणजे सूर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करण्यास विशेषेकरून प्राधिकृत केलेले असल्यास तेवढे खेरीजकरून एरव्ही, तसे करता येणार नाही;

(ज) खारचाटण, पाण्याची डबकी किंवा इतर पाणवठ्याच्या जागा यांवर किंवा त्यांकडे जाणाऱ्या रस्त्यावर किंवा मार्गावर वाळवंटातील पक्षी किंवा पाणपक्षी यांहून इतर कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही;

(झ) शासनाच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीवर, अशा जमिनीच्या मालकाच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या किंवा कायदेशीर ताबाधारकाच्या संमतीशिवाय कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही;

(ञ) त्या प्रयोजनार्थ तो लायसन धारण करीत असला तरीही कलम १६ मध्ये निर्देशिलेल्या बंद हंगामात कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही;

(ट) कुत्र्यांच्या मदतीने पाणपक्षी, चकोर, तितर किंवा लावपक्षी यांखेरीज इतर कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही.

(२) पोटकलम (१) चे उपबंध उपद्रवी जीवांच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

## प्रकरण ४ थे

## अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, राखीव मृगयाक्षेत्रे व बंद क्षेत्रे

### अभयारण्ये

अभयारण्ये घोषित करणे.

१८. (१) राज्य शासनास जर कोणतेही क्षेत्र—पारिस्थितिकीय, प्राणीय, वनस्पतीय, भूरचनाशास्त्रीय, प्राणिशास्त्रीय किंवा नैसर्गिक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण वाटत असेल तर, त्यास अधिसूचनेद्वारे असे क्षेत्र वन्य जीवसृष्टी किंवा तिच्या सभोवतालचे वातावरण संरक्षित करण्यासाठी, त्यांचा वंशविस्तार करण्यासाठी किंवा त्यांचा विकास करण्यासाठी अभयारण्य म्हणून घोषित करता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिसूचनेत शक्य तेथवर अशा क्षेत्राचा स्थानविशेष व सीमा विनिर्दिष्ट करण्यात येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी अशा क्षेत्राचे वर्णन रस्ते, नद्या, पर्वतश्रेणी अथवा इतर सुपरिचित किंवा सहज ओळखता येण्यासारख्या सीमारेषा देऊन करता येईल.

जिल्हाधिकाऱ्याने अधिकार ठरवणे.

१९. जेव्हा केव्हा एखादे क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित करण्यात येईल तेव्हा, जिल्हाधिकारी अभयारण्याच्या सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीतील किंवा जमिनींच्या बाबतीतील कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारांचे अस्तित्व, स्वरूप आणि व्याप्ती याबाबत चौकशी करील व ती ठरवील.

अधिकार उपार्जित होण्यास आडकाठी.

२०. कलम १८ खाली अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राच्या सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीत, तिच्यावर किंवा तिच्याबाबतीत मृत्युपत्रीय किंवा अमृत्युपत्रीय उत्तराधिकाराने असेल तेवढा खेरीजकरून एरव्ही, कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

जिल्हाधिकाऱ्याकडून उद्घोषणा.

२१. जेव्हा कलम १८ खाली अधिसूचना काढण्यात आली असेल तेव्हा, जिल्हाधिकारी तिच्यातील समाविष्ट क्षेत्रामध्ये अथवा त्याच्या आसमंतामध्ये असलेल्या प्रत्येक नगरातील किंवा गावातील प्रादेशिक भाषेत एक उद्घोषणा प्रकाशित करील व ती उद्घोषणा—

(क) अभयारण्याचा स्थानविशेष व सीमा शक्य तितक्या अचूकपणे विनिर्दिष्ट करणारी असेल; आणि

(ख) कलम १९ मध्ये नमूद केलेला कोणताही अधिकार कोणत्याही व्यक्तीने अशा उद्घोषणेच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत विहित नमुन्यात अशा अधिकाराचे आवश्यक तितके विगतवार स्वरूप व व्याप्ती आणि त्याबाबत कोणतीही भरपाई मागितलेली असेल तर तिची रक्कम व त्यासंबंधीचा तपशील जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करावा असे आवश्यक करणारी असेल.

जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी.

२२. मागणीदारावर विहित नोटीस बजावल्यानंतर जिल्हाधिकारी—

(क) कलम २१-खंड (ख) खाली त्याजपुढे दाखल केलेली हक्कमागणी; आणि

(ख) कलम १९ मध्ये नमूद केलेल्या आणि कलम २१-खंड (ख) खाली हक्कमागणी न केलेल्या कोणत्याही अधिकाराचे अस्तित्व,

याबाबत त्वरेने कागदपत्रांवरून आणि त्याविषयी माहीतगार असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या साक्षीपुराव्यावरून खातरजमा करता येईल तेथवर चौकशी करील.

जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती.

२३. अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकाऱ्यास पुढील शक्ती वापरता येतील, त्या अशा—

(क) कोणत्याही जमिनीत किंवा जमिनीवर प्रवेश करण्याची, आणि ती सीमांकित करून तिचा नकाशा तयार करण्याची अथवा तसे करण्यास इतर कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्याची शक्ती;

(ख) दाव्यांची संपरीक्षा करण्यासाठी दिवाणी न्यायालयाकडे निहित असतात त्या शक्ती.

अधिकार संपादन.

२४. (१) कलम १९ मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही जमिनीतील किंवा जमिनीवरील अधिकाराबाबत केलेल्या हक्कमागणीच्या बाबतीत, जिल्हाधिकारी ती पूर्णतः किंवा अंशतः मान्य करणारा किंवा नाकारणारा आदेश देईल.

(२) जर अशी हक्कमागणी पूर्णतः किंवा अंशतः मान्य करण्यात आली तर, जिल्हाधिकाऱ्यास एकतर,—

(क) संकल्पित अभयारण्याच्या सीमांमधून अशी जमीन वगळता येईल, अथवा

(ख) अशा जमिनीचा मालक किंवा अधिकारांचा धारक आणि शासन यांच्यामधील करारानुसार मालकाने किंवा अशा अधिकारांच्या धारकाने अशा जमिनीतील किंवा तीवरील आपले अधिकार शासनाप्रत अभ्यर्पित करण्याचे कबूल केले असल्यास तेवढे खेरीजकरून एरव्ही आणि 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) यामध्ये उपबंधित केली असेल अशी भरपाई देऊन, अशी जमीन किंवा अधिकार संपादन करण्याची कार्यवाही करता येईल.

२५. (१) अशी जमीन अथवा अशा जमिनीतील किंवा जमिनीवरील अधिकार संपादन करण्याच्या प्रयोजनार्थ,— संपादन कार्यवाही.

(क) जिल्हाधिकारी हा, 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) याखाली कार्यवाही करणारा जिल्हाधिकारी असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) मागणीदार हा, हितसंबंधी असणारी व त्या अधिनियमाच्या कलम ९ खाली दिलेल्या नोटिशीस अनुसरून त्याजपुढे उपस्थित होणारी व्यक्ती असल्याचे मानले जाईल ;

(ग) त्या अधिनियमाच्या कलम ९ च्या पूर्ववर्ती कलमांतील उपबंधांचे अनुपालन करण्यात आले असल्याचे मानले जाईल ;

(घ) भरपाईच्या बाबतीत मागणीदाराच्या नावे देववलेली रक्कम त्याने स्वीकारली नाही तर, त्या अधिनियमाच्या कलम १८ च्या अर्थानुसार मागणीदार म्हणजे जिने निवाडा स्वीकारला नाही अशी हितसंबंधी व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि तो त्या अधिनियमाच्या ३ ऱ्या भागाच्या उपबंधांन्वये निवाड्याविरुद्ध दाद मागण्यासाठी कार्यवाही करण्यास हक्कदार राहील ;

(ङ) जिल्हाधिकारी मागणीदाराच्या संमतीने अथवा न्यायालय दोन्ही पक्षकारांच्या संमतीने, जमिनीच्या अथवा पैशाच्या अथवा अंशतः जमिनीच्या व अंशतः पैशाच्या स्वरूपात भरपाई देववू शकेल ; आणि

(च) सार्वजनिक रस्ता किंवा सामाईक गायरान बंद होत असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने व्यवहार्य व सोयीस्कर असेल तेथवर, पर्यायी सार्वजनिक रस्त्याची किंवा पर्यायी सामाईक गायरानाची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये केलेले कोणत्याही जमिनीचे किंवा तिच्यातील हितसंबंधाचे संपादन हे, सार्वजनिक प्रयोजनार्थ केलेले संपादन असल्याचे मानले जाईल.

२६. सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे राज्य शासन कलमे १९ ते २५ अन्वये (दोन्ही धरून) जेव्हा जिल्हाधिकाऱ्याला शक्ती वापरता येण्यासारख्या असतात व त्याने कर्तव्ये करावयाची असतात तेव्हा, आदेशात विनिर्दिष्ट असेल अशा अधिकाऱ्याने त्या शक्तींचा वापर करावा व ती कर्तव्ये पार पाडावी असे निदेशित करू शकेल. जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचे प्रत्यायोजन.

२७. (१) (क) कामावर असलेला लोकसेवक ; अभयारण्यात प्रवेश करण्यावर निर्बंध.

(ख) मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी याने जिला अभयारण्याच्या सीमांच्या आत राहण्यास परवानगी दिलेली असेल ती व्यक्ती ;

(ग) अभयारण्याच्या सीमांमधील स्थावर मालमत्तेवर जिचा कोणताही अधिकार असेल ती व्यक्ती ;

(घ) सार्वजनिक हमरस्त्यावरील अभयारण्यातून जाणारी कोणतीही व्यक्ती; आणि

(ङ) खंड (क), खंड (ख) किंवा खंड (ग) यांमध्ये निर्देशिलेल्या व्यक्तीवर अवलंबून असलेली व्यक्ती,

यांहून अन्य कोणत्याही व्यक्तीला कलम २८ खाली दिलेल्या परवान्याअन्वये व त्यातील शर्तीस अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, अभयारण्यात प्रवेश करता येणार नाही किंवा निवास करता येणार नाही.

(२) प्रत्येक व्यक्ती, जोवर ती अभयारण्यात निवास करील तोवर—

(क) अभयारण्यात ह्या अधिनियमाविरुद्ध गुन्हा घडण्याला प्रतिबंध करण्यास ;

(ख) अशा अभयारण्यात ह्या अधिनियमाविरुद्ध असा कोणताही गुन्हा घडलेला आहे असे सकारण वाटत असेल तर, गुन्हेगारास शोधून काढण्याच्या व त्याला अटक करण्याच्या कामी मदत करण्यास ;

(ग) कोणत्याही वन्य प्राण्याचा मृत्यू झाल्याचे कळवण्यास आणि मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी त्याचा ताबा घेईपर्यंत त्याचे अवशेष सुरक्षित ठेवण्यास ;

(घ) अशा अभयारण्यातील ज्या कोणत्याही आगीची त्यास जाणीव झाली असेल किंवा माहिती मिळाली असेल ती विझविण्यास आणि अशा अभयारण्याच्या परिसरातील ज्या कोणत्याही आगीची त्यास जाणीव किंवा माहिती असेल ती पसरण्यास आपल्या अखत्यारात असलेल्या कोणत्याही कायदेशीर साधनांनिशी प्रतिबंध करण्यास ; आणि

(ङ) या अधिनियमाविरुद्ध कोणताही गुन्हा घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा अशा गुन्ह्याबाबत अन्वेषण करण्याच्या कामी जो कोणताही वन अधिकारी, मुख्य वन्य जीव रक्षक, वन्य जीव रक्षक किंवा पोलीस अधिकारी तिच्या मदतीची मागणी करील त्याला मदत करण्यास,

बांधलेली असेल.

परवाना मंजूर करणे.

२८. (१) मुख्य वन्य जीव रक्षक, अर्ज आल्यावर कोणत्याही व्यक्तीस पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी अभयारण्यात प्रवेश करण्याचा किंवा तेथे निवास करण्याचा परवाना मंजूर करू शकेल, ती अशी :—

(क) वन्य जीवांबाबत अन्वेषण किंवा अभ्यास व तदानुषंगिक प्रयोजने ;
(ख) छायाचित्रण ;
(ग) शास्त्रीय संशोधन ;
(घ) पर्यटन ;
(ङ) अभयारण्यात निवास करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी कायदेशीर व्यवहार करणे.

(२) अभयारण्यात प्रवेश करण्याचा किंवा निवास करण्याचा परवाना हा विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने व अशी फी भरण्यात आल्यावर देण्यात येईल.

परवान्याशिवाय अभयारण्यात मृगया करण्यास बंदी.

२९. (१) या अधिनियमात इतरत्र काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीला अभयारण्यातील कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करता येणार नाही अथवा तेथून कोणताही वन्य प्राणी—मग तो जिवंत असो वा मेलेला असो—अथवा अशा प्राण्यापासून मिळवलेले कोणतेही शिकारस्मारक, अप्रमाधित शिकारस्मारक किंवा सागुती घेऊन जाता येणार नाही :

परंतु,—

(क) वन्य जीवांचे अधिक चांगल्याप्रकारे संरक्षण करण्यासाठी, किंवा

(ख) इतर कोणत्याही सुयोग्य व पुरेशा कारणासाठी,

अभयारण्यातील एखाद्या वन्य प्राण्याची मृगया करणे किंवा त्यास तेथून हलवणे जरूरीचे आहे अशी मुख्य वन्य जीव रक्षकाची खात्री झाली तर, त्यास राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, स्वतः प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली अशा वन्य प्राण्याची मृगया करण्यास किंवा त्यास तेथून हलवण्यास कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करणारा परवाना मंजूर करता येईल किंवा अशा वन्य प्राण्याची मृगया करण्याची किंवा त्यास हलवण्याची व्यवस्था करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली मंजूर केलेल्या परवान्यात, अशा परवानाच्या धारकास, कोणत्या प्रकारच्या व किती वन्य प्राण्यांची शिकार करता येईल किंवा ते हलवता येतील तो प्रकार आणि ती संख्या विनिर्दिष्ट केली जाईल.

(३) मुख्य वन्य जीव रक्षक, कलम २८ खाली किंवा या कलमाखाली मंजूर केलेला परवाना सुयोग्य व पुरेशा कारणास्तव, ते कारण लेखी नमूद करून रद्द करू शकेल:

परंतु, परवान्याच्या धारकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज तो याप्रमाणे रद्द केला जाणार नाही.

(४) पोटकलम (३) खाली परवाना रद्द केल्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तो याप्रमाणे रद्द झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल व त्याचा निर्णय अंतिम राहील :

परंतु, जर अपील वेळीच दाखल न करण्यामागे अपीलकर्त्याला पुरेसे कारण होते याबाबत राज्य शासनाची खात्री झाली तर, त्यास पूर्वोक्त कालावधी संपल्यानंतर सादर केलेले एखादे अपीलही दाखल करून घेता येईल.

आग लावण्यास बंदी.

३०. कोणत्याही व्यक्तीला अभयारण्यास आग लावता येणार नाही किंवा अभयारण्यास धोका निर्माण होईल अशारीतीने त्या अभयारण्यात अग्नी प्रज्वलित करता येणार नाही किंवा कोणताही विस्तव जळत राहू देता येणार नाही.

अभयारण्यात हत्यारासह प्रवेश करण्यास बंदी.

३१. मुख्य वन्य जीव रक्षकाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीला अभयारण्यात कोणत्याही हत्यारासह प्रवेश करता येणार नाही.

क्षतिकारक पदार्थांचा वापर करण्यास मनाई.

३२. कोणत्याही व्यक्तीला अशा अभयारण्यातील कोणत्याही वन्य जीवास ज्यांमुळे क्षती पोहोचेल किंवा धोका निर्माण होईल अशी रसायने, स्फोटक द्रव्ये किंवा इतर कोणतेही पदार्थ वापरता येणार नाहीत.

अभयारण्यांचे नियंत्रण.

३३. मुख्य वन्य जीव रक्षक म्हणजे असा प्राधिकारी असेल की, जो सर्व अभयारण्यांवर नियंत्रण ठेवील, त्यांची व्यवस्था पाहील व ती सुस्थितीत ठेवील व त्या प्रयोजनार्थ तो कोणत्याही अभयारण्याच्या सीमांमध्ये,—

(क) अशा अभयारण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक वाटतील असे रस्ते, पूल, इमारती, कुंपणे किंवा नाकी बांधू शकेल किंवा अशी इतर बांधकामे करू शकेल ;

(ख) ज्यायोगे अभयारण्यातील वन्य प्राण्यांची सुरक्षा आणि अभयारण्याचे व त्यातील वन्य प्राण्यांचे रक्षण यांच्या दृष्टीने खात्रीलायक होईल अशी तजवीज करील ;

(ग) कोणत्याही निसर्गनिवासाची सुधारणा करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा उपाययोजना वन्य जीवांच्या हितार्थ करू शकेल ;

(घ) गुराढोरांची चराई किंवा संचार यांबाबत वन्य जीवसृष्टीच्या हितानुरूप विनियमन करू शकेल, नियंत्रण ठेवू शकेल किंवा त्यास बंदी करू शकेल ;

(ङ) कोणत्याही प्रकारच्या मासेमारीचे विनियमन करू शकेल, त्यावर नियंत्रण ठेवू शकेल किंवा त्यास बंदी करू शकेल.

**शस्त्रे बाळगणाऱ्या विवक्षित व्यक्तींची नोंदणी.**

३४. (१) कोणतेही क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत अशा कोणत्याही अभयारण्यात अथवा अभयारण्यापासून दहा किलोमीटरच्या परिसरात राहणारी जी व्यक्ती 'शस्त्र अधिनियम, १९५९' (१९५९ चा ५४) याखाली शस्त्रे बाळगण्याचे लायसन धारण करीत असून किंवा त्या अधिनियमाच्या उपबंधांपासून सूट मिळालेली असून शस्त्रे बाळगून असेल अशा प्रत्येक व्यक्तीला, विहित अशा नमुन्यात व अशी फी भरून आणि अशा मुदतीत, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे आपल्या नावाच्या नोंदणीसाठी अर्ज करावा लागेल.

(२) पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यावर मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी विहित असेल अशा रीतीने अर्जदाराचे नाव नोंदवील.

## राष्ट्रीय उद्याने

**राष्ट्रीय उद्याने घोषित करणे.**

३५. (१) जे कोणतेही क्षेत्र—मग ते अभयारण्यात असो वा नसो—पारिस्थितिकीय, प्राणीय' वनस्पतीय, भूरचनाशास्त्रीय किंवा प्राणिशास्त्रीय दृष्टीने संबद्ध किंवा महत्त्वाचे असून तेथील वन्य जीवसृष्टी किंवा तिच्या सभोवतालचे वातावरण संरक्षित करण्यासाठी, त्यांचा वंशविस्तार करण्यासाठी किंवा त्यांचा विकास करण्यासाठी त्याची राष्ट्रीय उद्यान म्हणून रचना करणे जरूरीचे आहे असे जेव्हा जेव्हा राज्य शासनाला वाटेल तेव्हा, त्यास अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय उद्यान म्हणून अशा क्षेत्राची रचना करण्याचा आपला उद्देश जाहीर करता येईल.

(२) राष्ट्रीय उद्यान म्हणून जे क्षेत्र घोषित करण्याचा उद्देश असेल त्या क्षेत्राच्या सीमा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिसूचनेद्वारे निश्चित केल्या जातील.

(३) जेव्हा एखादे क्षेत्र राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्याचे उद्देशित असते तेव्हा, कलमे १९ ते २६ (दोन्ही धरून) यांचे उपबंध जसे अभयारण्यातील कोणत्याही जमिनीसंबंधीच्या हक्कमागण्यांबाबत अन्वेषण व निर्णय आणि अधिकार-विलोपन यांना लागू आहेत तसे ते, होईल तेथवर, अशा क्षेत्रातील कोणत्याही जमिनीसंबंधीच्या उक्त बाबींना लागू होतील.

(४) जेव्हा पुढील घटना घडल्या असतील तेव्हा, म्हणजे—

(क) हक्कमागण्या सादर करण्याचा कालावधी उलटून गेला असून राष्ट्रीय उद्यान म्हणून जे क्षेत्र घोषित करण्याचा उद्देश असेल त्या क्षेत्रातील जमिनीच्या संबंधात जर काही हक्कमागण्या असल्या तर त्या सर्व राज्य शासनाने निकालात काढल्या असतील तेव्हा, आणि

(ख) राष्ट्रीय उद्यानात ज्या जमिनी समाविष्ट करण्याचे योजिले असेल त्या जमिनीच्या संबंधातील सर्व अधिकार राज्य शासनाच्या ठायी निहित झाले असतील तेव्हा,

राज्य शासन, राष्ट्रीय उद्यानात जे समाविष्ट करण्यात येणार असेल त्या क्षेत्राच्या सीमा विनिर्दिष्ट करणारी अधिसूचना प्रकाशित करील आणि अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकी व तेव्हापासून उक्त क्षेत्र राष्ट्रीय उद्यान होणार असल्याचे घोषित करील.

(५) राज्याच्या विधानमंडळाने संमत केलेल्या ठरावानुसार असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, राष्ट्रीय उद्यानाच्या सीमारेषांमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

(६) मुख्य वन्य जीव रक्षकाने मंजूर केलेल्या परवान्याखाली व त्यास अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला राष्ट्रीय उद्यानातील कोणताही वन्य जीव नष्ट करता येणार नाही, कामाला जुंपता येणार नाही किंवा तेथून हलवता येणार नाही अथवा अशा राष्ट्रीय उद्यानातील कोणत्याही वन्य प्राण्याचा निसर्गनिवास नष्ट करता येणार नाही, किंवा त्याची नासधूस करता येणार नाही अथवा कोणत्याही वन्य प्राण्यास आपल्या निसर्गनिवासापासून वंचित करता येणार नाही आणि राष्ट्रीय उद्यानातील वन्य जीवसृष्टीची सुधारणा व अधिक चांगली व्यवस्था यासाठी तेथील वन्य जीवांस याप्रमाणे नष्ट करणे, त्यांस कामास जुंपणे किंवा हलवणे जरूरीचे आहे याबाबत स्वतःची खात्री होऊन राज्य शासनाने परवाना दिला जाण्यास प्राधिकृती दिल्याशिवाय असा कोणताही परवाना मंजूर केला जाणार नाही.

(७) राष्ट्रीय उद्यानात कोणत्याही गुराढोराला चारण्यास परवानगी दिली जाणार नाही आणि अशा राष्ट्रीय उद्यानात प्रवेश करण्यास प्राधिकृत झालेली व्यक्ती अशा गुराढोरांचा वाहन म्हणून वापर करील तेव्हाची बाब खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही गुराढोरास अशा राष्ट्रीय उद्यानात प्रवेश करू दिला जाणार नाही.

(८) कलमे २७ व २८, कलमे ३० ते ३२ (दोन्ही धरून), आणि कलम ३३ चे खंड (क), (ख) आणि (ग) आणि कलम ३४ यांचे उपबंध जसे अभयारण्याच्या संबंधात लागू होतात तसे ते राष्ट्रीय उद्यानाच्या संबंधात, होईल तेथवर, लागू होतील.

### राखीव मृगयाक्षेत्र

राखीव मृगयाक्षेत्र घोषित करणे.

३६. (१) राज्य शासनास अधिसूचनेद्वारे कोणतेही क्षेत्र राखीव मृगयाक्षेत्र म्हणून घोषित करता येईल.

(२) मुख्य वन्य जीव रक्षकाने किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याने या कलमाखाली दिलेल्या लायसना-न्वये व त्याला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, अशा राखीव क्षेत्रात कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

### बंद क्षेत्र

बंद क्षेत्र घोषित करणे.

३७. (१) राज्य शासनास अधिसूचनेद्वारे कोणतेही क्षेत्र त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या काला-वधीपुरते मृगयेकरिता बंद क्षेत्र म्हणून घोषित करता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत बंद क्षेत्रात कोणत्याही वन्य प्राण्याची मृगया करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

### केंद्र शासनाने घोषित केलेली अभयारण्ये अथवा राष्ट्रीय उद्याने

क्षेत्रे ही अभयारण्ये किंवा राष्ट्रीय उद्याने म्हणून घोषित करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३८. (१) जेव्हा राज्य शासन अभयारण्यामध्ये नसलेले असे आपल्या नियंत्रणाखालील कोणतेही क्षेत्र केंद्र शासनास भाडेपट्ट्याने देईल किंवा अन्यथा हस्तांतरित करील तेव्हा, जर आपणांकडे याप्रमाणे हस्तांतरित करण्यात आलेल्या क्षेत्रासंबंधी कलम १८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्ती पुऱ्या झाल्या आहेत याबाबत केंद्र शासनाची खात्री झाली तर, त्यास अधिसूचनेद्वारे असे क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित करता येईल आणि कलमे १९ ते ३५ (दोन्ही धरून), कलमे ५४ व ५५ यांचे उपबंध जसे राज्य शासनाने घोषित केलेल्या अभयारण्याच्या संबंधात लागू होतात तसे ते अशा अभयारण्याच्या संबंधात लागू होतील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही क्षेत्राबाबत,—मग असे क्षेत्र केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने अभयारण्य म्हणून घोषित केलेले असो वा नसो—कलम ३५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पुऱ्या झाल्या आहेत याबद्दल केंद्र शासनाची खात्री झाली तर, त्यास अधिसूचनेद्वारे असे क्षेत्र राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करता येईल आणि कलमे ३५, ५४ व ५५ चे उपबंध जसे राज्य शासनाने घोषित केलेल्या राष्ट्रीय उद्यानाच्या संबंधात लागू होतात तसे ते अशा राष्ट्रीय उद्यानाच्या संबंधात लागू होतील.

(३) केंद्र शासनाने घोषित केलेल्या अभयारण्याच्या किंवा राष्ट्रीय उद्यानाच्या संबंधात, पोटकलमे (१) व (२) यांमध्ये निर्देशिलेल्या कलमांखाली जेव्हा मुख्य वन्य जीव रक्षकाला शक्ती वापरता येतात व कर्तव्ये करावयाची असतात तेव्हा, संचालक किंवा यासंबंधात संचालकाने प्राधिकृत केला असेल असा अन्य अधिकारी त्या शक्ती वापरील व ती कर्तव्ये पार पाडील, आणि पूर्वोक्त कलमांमधील राज्य शासनाच्या निर्देशांचा अर्थ, केंद्र शासनाचे निर्देश म्हणून लावला जाईल आणि त्यांतील राज्याच्या विधानमंडळाच्या निर्देशाचा अर्थ, संसदेचा निर्देश म्हणून लावला जाईल.

## प्रकरण ५ वे

### वन्य प्राणी, प्राणिजन्य वस्तू आणि शिकारस्मारके यांचा व्यापार किंवा वाणिज्य व्यवहार

वन्य प्राणी, वगैरे शासनाची मालमत्ता असणे.

३९. (१) (क) ज्याची कलम ११ खाली किंवा कलम २९ चे पोटकलम (१) किंवा कलम ३५ चे पोटकलम (६) यांखाली मृगया केलेली असेल अथवा जो वन्य प्राणी या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमातील किंवा आदेशातील कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण करून बंदिस्त अवस्थेत ठेवलेला किंवा तशा अवस्थेत वाढवलेला असेल अथवा जो मृतावस्थेत आढळला असेल अथवा ज्याची लायसनाशिवाय किंवा चूकभुलीने हत्या झाली असेल असा, उपद्रवी जीवांहून अन्य प्रत्येक वन्य प्राणी; आणि

(ख) ज्याबाबत हा अधिनियम अथवा त्याखाली काढलेला कोणताही नियम किंवा आदेश याविरुद्ध कोणताही गुन्हा करण्यात आला असेल अशा, खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही वन्य प्राण्यापासून मिळालेली प्रत्येक प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती,

ही राज्य शासनाची मालमत्ता राहील आणि जर केंद्र शासनाने घोषित केलेल्या अभयारण्यात किंवा राष्ट्रीय उद्यानात अशा प्राण्याची शिकार करण्यात आली असेल तर, असा प्राणी अथवा अशा प्राण्यापासून मिळालेली प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती ही केंद्र शासनाची मालमत्ता राहील.

(२) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही मार्गाने शासकीय मालमत्तेचा कब्जा मिळवील त्या व्यक्तीला असा कब्जा मिळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, सर्वात नजीकच्या पोलीस ठाण्याकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे असा कब्जा मिळाल्याचे वृत्त कळवावे लागेल आणि तसे आवश्यक करण्यात आल्यास, अशी मालमत्ता अशा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे किंवा, प्रकरणपरत्वे, अशा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सुपूर्द करावी लागेल.

(३) कोणत्याही व्यक्तीला, मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी याच्या पूर्वपरवानगीशिवाय अशी शासकीय मालमत्ता—

(क्) संपादन करता येणार नाही अथवा आपल्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली ठेवता येणार नाही, किंवा

(ख्) दानाद्वारे, विक्रीद्वारे किंवा अन्यथा कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित करता येणार नाही, किंवा

(ग्) नष्ट करता येणार नाही किंवा खराब करता येणार नाही.

४०. (१) १ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही बंदिस्त प्राणी अथवा अशा प्राण्यापासून मिळविलेले कोणतेही अप्रसाधित शिकारस्मारक अथवा अशा प्राण्याची खारवलेली किंवा वाळवलेली कातडी अथवा कस्तुरीमृगाची कस्तुरी अथवा गेंडयाचे शिंग या अधिनियमाच्या प्रारंभी जिच्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात असेल त्या प्रत्येक व्यक्तीला, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत आपल्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेतील किंवा कब्जातील प्राण्यांची किंवा वरील प्रकारच्या वस्तूंची संख्या, त्यांचे वर्णन आणि असा प्राणी किंवा वस्तू ज्या ठिकाणी ठेवली असेल ती जागा यांबाबत मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अधिकथन करावे लागेल. अधिकथने.

(२) १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी अथवा अशा प्राण्यापासून मिळविलेले कोणतेही अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती अथवा अशा प्राण्याची खारवलेली किंवा वाळवलेली कातडी अथवा कस्तुरीमृगाची कस्तुरी अथवा गेंडयाचे शिंग या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही व्यक्तीला मुख्य वन्य जीव रक्षकाच्या किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज संपादन करता येणार नाही, प्राप्त करता येणार नाही, आपल्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात ठेवता येणार नाही, विकता येणार नाही किंवा विकत देऊ करता येणार नाही, किंवा अन्यथा हस्तांतरित करता येणार नाही किंवा त्याची वाहतूक करता येणार नाही.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मधील कोणतीही गोष्ट सार्वजनिक वस्तुसंग्रहालयास किंवा प्राणिसंग्रहालयास लागू असणार नाही.

(४) राज्य शासन अधिसूचनेद्वारे कोणत्याही व्यक्तीस, तिने आपल्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात असलेली १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राण्यापासून मिळालेली कोणतीही प्राणिजन्य वस्तू किंवा शिकारस्मारक (कस्तुरीमृगाची कस्तुरी किंवा गेंडयाचे शिंग याहून अन्य) अथवा खारवलेली किंवा वाळवलेली कातडी याबाबत मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे विहित असेल अशा नमुन्यात, अशा रीतीने व अशा मुदतीत अधिकथन करावे असे बंधन घालू शकेल.

४१. (१) कलम ४० खाली केलेले अधिकथन मिळाल्यावर, मुख्य वन्य जीव रक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास, विहित असेल अशी नोटीस दिल्यानंतर, अशा रीतीने व अशा वेळी,— चौकशी करणे व जंत्री तयार करणे.

(क्) कलम ४० मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तीच्या वास्तूमध्ये प्रवेश करता येईल;

(ख्) चौकशी करून, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारके, अप्रसाधित शिकारस्मारके, खारवलेली व वाळवलेली कातडी आणि १ ल्या अनुसूचीमध्ये आणि २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेले बंदिस्त प्राणी यांच्या जंत्र्या तयार करता येतील; आणि

(ग्) विहित असेल अशा रीतीने ते प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारके किंवा अप्रसाधित शिकारस्मारके यांवर ओळखचिन्हे लावता येतील.

(२) कोणत्याही व्यक्तीला या प्रकरणामध्ये निर्देशिलेले कोणतेही ओळखचिन्ह पुसून टाकता येणार नाही किंवा तसे नकली चिन्ह तयार करता येणार नाही.

४२. कलम ४० च्या प्रयोजनांसाठी मुख्य वन्य जीव रक्षक ज्या कोणत्याही व्यक्तीकडे त्याच्या मते कोणताही वन्य प्राणी, अथवा कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक यांचा कायदेशीर कब्जा असेल तिला, विहित असेल अशा नमुन्यात मालकी प्रमाणपत्र देऊ शकेल आणि शक्य असेल तर, ओळख पटण्यासाठी, अशा प्राणिजन्य वस्तूवर, शिकारस्मारकावर किंवा अप्रसाधित शिकारस्मारकावर खूण लावू शकेल. मालकी प्रमाणपत्र.

४३. (१) पोटकलम (२), पोटकलम (३) आणि पोटकलम (४) यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, (व्यापाऱ्याहून अन्य अशा) ज्या व्यक्तीकडे मालकी प्रमाणपत्र नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला, मुख्य वन्य जीव रक्षकाच्या किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज— प्राण्याचे हस्तांतरण, इ. चे विनियमन.

(क्) १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही वन्य प्राणी अथवा त्याच वर्गातील इतर कोणताही बंदिस्त प्राणी अथवा त्याच्यापासून मिळालेली कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक, किंवा सागुती विकता येणार नाही, विकत देऊ करता येणार नाही अथवा विक्रीद्वारे, दानाद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही ;

(ख्) असा प्राणी अंशतः किंवा पूर्णतः अंतर्भूत करून प्राणिजन्य वस्तू बनवता येणार नाहीत;

(ग्) अशा प्राण्याच्या अप्रसाधित शिकारस्मारकावर चर्मपूरणाची प्रक्रिया करता येणार नाही.

(२) जेव्हा एखादी व्यक्ती, ज्याबाबत तिच्याकडे मालकी प्रमाणपत्र आहे असा कोणताही पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक, जेथे ती राहते त्या राज्यातून दुसऱ्या राज्यात हस्तांतरित करील किंवा त्याची वाहतूक करील अथवा राज्याबाहेरून हस्तांतरणाद्वारे संपादन करील तेव्हा, तिला हस्तांतरण किंवा वाहतूक ज्याच्या अधिकारितेत घडून आली त्या मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे हस्तांतरण किंवा वाहतूक झाल्यापासून तीस दिवसांच्या आत हस्तांतरणाचे किंवा वाहतुकीचे वृत्त कळवावे लागेल.

(३) जिच्याजवळ मालकी प्रमाणपत्र नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्याच्या अधिकारितेत हस्तांतरण किंवा वाहतूक करावयाची असेल त्या मुख्य वन्य जीव रक्षकाच्या किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला असा कोणताही प्राणी, कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हस्तांतरित करता येणार नाही किंवा त्याची वाहतूक करता येणार नाही अथवा त्या राज्याबाहेरून हस्तांतरणाद्वारे त्याचे संपादन करता येणार नाही.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) खाली कोणतीही परवानगी देण्यापूर्वी मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी, त्यात निर्देशिलेला प्राणी किंवा वस्तू कायदेशीरपणे संपादन केली असल्याची खात्री करून घेईल.

(५) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला कोणताही प्राणी, कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक यांचे हस्तांतरण किंवा वाहतूक करण्यास परवानगी देताना मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी,——

(क) त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर मालकी प्रमाणपत्र देईल;

(ख) जर पूर्वीच्या मालकाच्या नावाचे मालकी प्रमाणपत्र विद्यमान असेल तर, जिला हस्तांतरण केलेले असेल त्या व्यक्तीच्या नावे नवीन मालकी प्रमाणपत्र देईल;

(ग) असा कोणताही प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक यावर ओळखचिन्ह लावू शकेल.

(६) या कलमातील कोणतीही गोष्ट,——

(क) मोरांच्या पिसांपासून बनवलेल्या प्राणिजन्य वस्तूंना किंवा शिकारस्मारकांना;

(ख) एका सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाने किंवा प्राणिसंग्रहालयाने अन्य एखाद्या सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाशी किंवा प्राणिसंग्रहालयाशी केलेल्या कोणत्याही संव्यवहारास,

लागू असणार नाही.

**लायसनाशिवाय शिकारस्मारकांचा किंवा प्राणिजन्य वस्तूंचा व्यापार करण्यास बंदी.**

४४. (१) पोटकलम (४) खाली मंजूर केलेल्या लायसनाखाली व त्याला अनुसरून असले तेवढे खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला,——

(क) (एक) कोणत्याही प्राणिजन्य वस्तूंचा निर्माता किंवा व्यापारी म्हणून; किंवा

(दोन) प्राणिचर्मपूरक म्हणून; किंवा

(तीन) शिकारस्मारकांचा किंवा अप्रसाधित शिकारस्मारकांचा व्यापारी म्हणून; किंवा

(चार) बंदिस्त प्राण्यांचा व्यापारी म्हणून; किंवा

(पाच) सागुतीचा व्यापारी म्हणून;

धंदा सुरू करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही; अथवा

(ख) कोणत्याही खाद्यगृहात सागुती शिजवता येणार नाही किंवा वाढता येणार नाही :

परंतु, जी व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेला धंदा किंवा व्यवसाय करीत होती तिने अशा प्रारंभापासून तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत किंवा तिने स्वतःला लायसन मिळण्यासाठी त्या कालावधीत अर्ज केला असेल तर तिला असे लायसन मंजूर होईपर्यंत किंवा तिला लायसन मंजूर होऊ शकत नाही हे कळविण्यात येईपर्यंत असा धंदा किंवा व्यवसाय चालवण्यास तिला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही :

परंतु आणखी असे की, या कलमातील कोणतीही गोष्ट हस्तिदंतापासून किंवा मोराच्या पिसांपासून बनवलेल्या वस्तूंच्या निर्मात्यास किंवा व्यापाऱ्यास लागू असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—— या कलमाच्या प्रयोजनांसाठी "खाद्यगृह" यात हॉटेल, उपाहारगृह किंवा जेथे पैसे दिल्यावर कोणताही खाद्यपदार्थ वाढला जातो अशी इतर कोणतीही जागा यांचा समावेश आहे——मग असे पैसे अशा खाद्यपदार्थाबद्दल स्वतंत्रपणे दिले जावोत वा भोजन व निवास यांबद्दल आकारल्या जाणाऱ्या रकमेत समाविष्ट असोत.

(२) प्रत्येक प्राणिजन्य वस्तूंचा निर्माता किंवा व्यापारी अथवा बंदिस्त प्राणी, शिकारस्मारके किंवा अप्रसाधित शिकारस्मारके यांचा प्रत्येक व्यापारी अथवा प्रत्येक चर्मपूरक याला या अधिनियमाच्या प्रारंभापासून पंधरा दिवसांच्या आत, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे अधिकथन करून, अशा अधिकथनाच्या दिनांकास, प्रकरणपरत्वे, प्राणिजन्य वस्तू, बंदिस्त प्राणी, शिकारस्मारके किंवा अप्रसाधित शिकारस्मारके यांचा स्वतःजवळ असलेला साठा कळवावा लागेल आणि मुख्य वन्य जीव रक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास, प्रकरणपरत्वे, अशा प्रत्येक प्राणिजन्य वस्तूवर, बंदिस्त प्राण्यावर, शिकारस्मारकावर किंवा अप्रसाधित शिकारस्मारकावर ओळखचिन्हे लावता येतील.

(३) लायसन मिळवण्याचा उद्देश असलेल्या, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रत्येक व्यक्तीला, या अधिनियमाच्या प्रारंभापासून पंधरा दिवसांच्या आत, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे लायसन मंजूर होण्यासाठी अर्ज करावा लागेल.

(४) (क) पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेला प्रत्येक अर्ज वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशी फी भरून करावा लागेल.

(ख) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले कोणतेही लायसन, या संबंधात विहित असतील अशा बाबी लक्षात घेऊन आणि त्या बाबींसंबंधी स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर लायसन मंजूर केले जावे अशी मुख्य वन्य जीव रक्षकाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री पटल्याशिवाय मंजूर केले जाणार नाही.

(५) या कलमाखाली मंजूर केलेल्या प्रत्येक लायसनामध्ये, लायसनधारकाला कोणत्या वास्तूत व कोणत्या शर्तीच्या अधीनतेने आपला धंदा चालवावा लागेल ते विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(६) या कलमाखाली मंजूर केलेले प्रत्येक लायसन,—

(क) ते मंजूर केल्याच्या दिनांकापासून एक वर्षापुरते विधिग्राह्य राहील;

(ख) हस्तांतरणीय असणार नाही;

(ग) एका वेळी जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या कालावधीकरता नूतनीकरण करण्याजोगे राहील.

(७) लायसनाच्या नूतनीकरणासाठी केलेला कोणताही अर्ज, अशा लायसनाच्या धारकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय आणि,—

(एक) अशा नूतनीकरणासाठी केलेला अर्ज त्याकरिता विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेला आहे, किंवा

(दोन) लायसन मंजूर होण्याच्या किंवा त्याचे नूतनीकरण होण्याच्या वेळी अर्जदाराने केलेले कोणतेही निवेदन चुकीचे होते किंवा महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे होते, किंवा

(तीन) अर्जदाराने लायसनामधील कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे अथवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण केलेले आहे, किंवा

(चार) अर्जदाराने विहित शर्ती पुऱ्या केलेल्या नाहीत,

याबाबत मुख्य वन्य जीव रक्षकाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय नामंजूर करण्यात येणार नाही.

(८) लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नूतनीकरणासाठी केलेला अर्ज मंजूर करणारा अथवा नामंजूर करणारा प्रत्येक आदेश लेखी देण्यात येईल.

(९) पूर्वगामी पोटकलमातील कोणतीही गोष्ट उपद्रवी जीवांच्या संबंधात लागू असणार नाही.

लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे.

४५. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीनतेने, मुख्य वन्य जीव रक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास, कलम ४४ खाली मंजूर किंवा नूतनीकरण केलेले कोणतेही लायसन सकारण निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल, मात्र ती कारणे नमूद करावी लागतील:

परंतु, लायसनधारकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज लायसन याप्रमाणे निलंबित किंवा रद्द केले जाणार नाही.

अपील.

४६. (१) कलम ४४ खाली लायसन मंजूर करण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या आदेशावर किंवा कलम ४५ खाली लायसन निलंबित किंवा रद्द करणाऱ्या आदेशावर,—

(क) जर तो आदेश प्राधिकृत अधिकाऱ्याने दिला असेल तर, मुख्य वन्य जीव रक्षकाकडे;

अथवा

(ख) जर तो आदेश मुख्य वन्य जीव रक्षकाने दिला असेल तर, राज्य शासनाकडे

अपील होऊ शकेल.

(२) पोटकलम (१)-खंड (क) खाली मुख्य वन्य जीव रक्षकाने अपीलान्ती दिलेल्या आदेशाच्या बाबतीत दुसरे अपील राज्य शासनाकडे होऊ शकेल.

(३) पूर्वोक्तानुसार त्या त्या गोष्टींच्या अधीनतेने, या कलमाखाली अपीलान्ती दिलेला प्रत्येक आदेश अंतिम राहील.

(४) या कलमाखालील अपील, ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश अर्जदारास कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल करावे लागेल :

परंतु, जर अपील वेळीच दाखल न करण्यामागे अपीलकर्त्याला पुरेसे कारण होते याबाबत अपील अधिकरणाची खात्री झाली तर, त्यास पूर्वोक्त कालावधी संपल्यानंतर सादर केलेले एखादे अपीलही दाखल करून घेता करता येईल.

नोंदी ठेवणे.

४७. या प्रकरणाखाली लायसनधारकाला,—

(क) त्याच्या व्यवहाराच्या नोंदी ठेवाव्या लागतील अणि विहित करण्यात येतील अशी प्रतिवेदने,—

(एक) संचालकाकडे किंवा तो यासंबंधात प्राधिकृत करील अशा अन्य अधिकाऱ्याकडे, आणि

(दोन) मुख्य वन्य जीव रक्षकाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावी लागतील; आणि

(ख) अशा अधिकाऱ्यांनी निरीक्षणासाठी मागणी केली असता त्यांना अशा नोंदी उपलब्ध करून द्याव्या लागतील.

लायसनधारकाने प्राणी खरेदी करणे, इत्यादी.

४८. या प्रकरणाखालील कोणत्याही लायसनधारकाला अधिनियमाखाली करण्यात येतील अशा नियमांस अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही,—

(क)(एक) ज्याच्या बाबतीत कलम ४४ च्या पोटकलम (२) च्या उपबंधांखाली अधिकथन करावे लागते पण करण्यात आलेले नाही असा कोणताही प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक अथवा अप्रसाधित शिकारस्मारक;

(दोन) ह्या अधिनियमाचे उपबंध किंवा तदन्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश याखाली कायदेशीरपणे संपादन करण्यात आलेला नाही असा कोणताही प्राणी अथवा अशी प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती

आपल्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात ठेवता येणार नाही;

(ख)(एक) कोणताही वन्य प्राणी पकडता येणार नाही, अथवा

(दोन) १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही बंदिस्त प्राणी अथवा त्यापासून मिळविलेली कोणतीही प्राणिजन्य वस्तू किंवा अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती संपादन करता येणार नाही, स्वीकारता येणार नाही, आपल्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात ठेवता येणार नाही किंवा विकता येणार नाही, किंवा विकत देऊ करता येणार नाही किंवा त्याची वाहतूक करता येणार नाही, अशी सागुती वाढता येणार नाही अथवा त्यावर चर्मपूरणाची प्रक्रिया करता येणार नाही अथवा असा प्राणी अंशतः किंवा पूर्णतः अंतर्भूत करून कोणतीही प्राणिजन्य वस्तू बनवता येणार नाही :

परंतु जेथे असा प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक संपादन केल्यामुळे, कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली ठेवल्यामुळे, एकातून दुसऱ्या राज्यात हस्तांतरण किंवा वाहतूक करणे अपरिहार्य होत असेल तर, संचालकाची किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज असे कोणतेही हस्तांतरण किंवा वाहतूक केली जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, पूर्वोक्त प्राणी किंवा वस्तू विधितः संपादन करण्यात आली आहे याबाबत संचालकाची किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय, पूर्वगामी परंतुकाखाली अशी कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.

लायसनधारकाहून अन्य व्यक्तीने बंदिस्त प्राणी खरेदी करणे, इत्यादी.

४९. ह्या अधिनियमान्वये ज्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस विक्री करण्याची किंवा अन्यथा हस्तांतरण करण्याची परवानगी दिली असेल त्याहून अन्य कोणाहीकडून कोणत्याही व्यक्तीला उपद्रवी जीवांहून अन्य कोणताही बंदिस्त प्राणी, वन्य प्राणी अथवा त्यापासून मिळविलेली कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक, अप्रसाधित शिकारस्मारक किंवा सागुती खरेदी करता येणार नाही :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट एखाद्या सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाने किंवा प्राणिसंग्रहालयाने अन्य कोणत्याही वस्तुसंग्रहालयाशी किंवा प्राणिसंग्रहालयाशी केलेल्या कोणत्याही संव्यवहारास लागू असणार नाही.

## प्रकरण ६ वे

## गुन्ह्यांस प्रतिबंध व त्यांचा तलास

प्रवेश करण्याची, झडती घेण्याची, अटक करण्याची व स्थानबद्ध करण्याची शक्ती.

५०. (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, संचालक किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी किंवा वन अधिकारी किंवा उप निरीक्षकाहून खालच्या दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी, जर त्यास एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाविरुद्ध गुन्हा केला असे समजण्यास वाजवी कारणे असतील तर, तो—

(क) कोणत्याही व्यक्तीस, तिच्या नियंत्रणाखाली, अभिरक्षेत किंवा कब्जात असलेला कोणताही बंदिस्त प्राणी, वन्य प्राणी, प्राणिजन्य वस्तू, सागुती, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक अथवा या अधिनियमाच्या उपबंधांखाली त्यास मंजूर झालेले किंवा त्याने ठेवणे आवश्यक असलेले असे कोणतेही लायसन, परवाना किंवा इतर दस्तऐवज निरीक्षणासाठी हजर करण्यास फर्मावू शकेल;

(ख्) झडती घेण्यासाठी किंवा चौकशी करण्यासाठी कोणतेही वाहन किंवा जलयान थांबवू शकेल आणि अशा व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही वास्तूमध्ये, जमिनीवर, वाहनात, किंवा जलयानात प्रवेश करून झडती घेऊ शकेल, आणि त्याच्या कब्जात असलेले कोणतेही प्रवासी सामान किंवा इतर वस्तू उघडून त्यांची झडती घेऊ शकेल;

(ग्) कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात असलेला जो कोणताही बंदिस्त प्राणी, वन्य प्राणी, प्राणिजन्य वस्तू, सागुती, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक ही शासकीय मालमत्ता आहे असे स्वतःस दिसून येईल त्याचे, असा कोणताही गुन्हा करताना वापरलेला सापळा, अवजार, वाहन, जलयान किंवा हत्यार यासकट अभिग्रहण करू शकेल, आणि अशी व्यक्ती उपस्थित होईल व तिजवर ठेवण्यात येईल त्या त्या दोषारोपाला ती उत्तर देईल याबाबत स्वतःची खात्री झाली नाही तर तिला अटक करून स्थानबद्ध करू शकेल.

(२) ज्याने किंवा ज्याच्या दुय्यम अधिकाऱ्याने पोटकलम (१) च्या खंड (क्) खाली कोणताही सापळा, अवजार, वाहन, जलयान किंवा हत्यार अभिग्रहण केले असेल असा, सहायक वन्य जीव रक्षण संचालकाच्या किंवा वन्य जीव रक्षकाच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी, त्याला ती मालमत्ता मुक्त करावयाची असल्यास, ज्या गुन्ह्याबद्दल अशा मालमत्तेचे अभिग्रहण करण्यात आले त्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे मालमत्तेच्या मालकाला तसे फर्मावण्यात आले तर व येईल तेव्हा ती हजर केली जाईल असे त्या मालकाने बंधपत्र करून दिल्यावर, ती मालमत्ता त्याप्रमाणे मुक्त करू शकेल.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याने, या अधिनियमाच्या उपबंधांखाली ज्यासाठी लायसन किंवा परवाना आवश्यक असेल अशी कोणतीही कृती करत असलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीस तो पाहील त्याला लायसन किंवा परवाना हजर करावयास लावण्यासाठी थांबवणे व अडकवून ठेवणे हे कायदेशीर होईल आणि जर अशी व्यक्ती, प्रकरणपरत्वे, लायसन किंवा परवाना हजर करण्यास चुकली तर, तिला वॉरंटाशिवाय अटक होऊ शकेल---मात्र अटक करू पाहणाऱ्या अधिकाऱ्याला तिने आपले नाव व पत्ता दिला आणि तिजविरुद्ध काढण्यात येईल अशा कोणत्याही समन्साला किंवा अन्य कार्यवाहीला ती रीतसर उत्तर देईल याबाबत त्या अधिकाऱ्याची तिने अन्यथा खात्री पटवली तर गोष्ट अलाहिदा.

(४) पूर्वगामी शक्तीअन्वये स्थानबद्ध केलेली कोणतीही व्यक्ती किंवा अभिग्रहण केलेल्या वस्तू यांबाबत कायद्यानुसार कार्यवाही होण्यासाठी त्या तात्काळ दंडाधिकाऱ्यापुढे नेण्यात येतील.

(५) जी कोणतीही व्यक्ती, ह्या कलमाखाली तिला हजर करण्यास सांगितलेली कोणतीही वस्तू हजर करण्यास वाजवी कारणाशिवाय चुकेल ती ह्या अधिनियमाविरुद्ध गुन्हा केल्याबद्दल दोषी होईल.

(६) (क्) जेव्हा या कलमाच्या उपबंधांखाली कोणतीही सागुती किंवा अप्रसाधित शिकारस्मारक अभिग्रहण करण्यात येईल तेव्हा, सहायक वन्य जीव रक्षण संचालक किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेला इतर कोणताही राजपत्रित दर्जाचा अधिकारी किंवा मुख्य वन्य जीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी यास त्याची विक्री करण्याची व्यवस्था करता येईल व विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाबाबत विहित असेल अशा रीतीने कार्यवाही करता येईल.

(ख्) जर या कलमाच्या उपबंधांखाली अभिग्रहण करण्यात आलेली सागुती किंवा अप्रसाधित शिकारस्मारक ही शासकीय मालमत्ता नसल्याचे शाबीत करण्यात आले तर, विक्रीपासून मिळणारे उत्पन्न मालकास परत करण्यात येईल.

(७) जेव्हा जेव्हा या अधिनियमाविरोधी कोणत्याही गुन्ह्याला प्रतिबंध करण्याच्या किंवा त्याचा तलास लावण्याच्या कामी किंवा या अधिनियमाचा भंग केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तींना पकडण्याच्या कामी साहाय्य मिळण्यासाठी अथवा पोटकलम (१)-खंड (क्) अनुसार अभिग्रहण करण्यासाठी पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणीही कोणत्याही व्यक्तीकडे येईल तेव्हा, अशा प्रकारे साहाय्य करणे हे अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे कर्तव्य असेल.

५१. (१) जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील अथवा या अधिनियमाखाली मंजूर झालेल्या कोणत्याही लायसनात किंवा परवान्यात असलेल्यांपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करील ती व्यक्ती, या अधिनियमाविरुद्ध गुन्हा केल्याबद्दल दोषी ठरेल अणि दोषसिद्धी झाली की, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल : दंड.

परंतु, जर घडलेला गुन्हा हा १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ ऱ्या अनुसूचीच्या २ ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी अथवा अशा प्राण्याची सागुती अथवा अशा प्राण्यापासून मिळालेली कोणतीही प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक यासंबंधी असेल अगर तो गुन्हा अभयारण्यातील किंवा राष्ट्रीय उद्यानातील शिकारीसंबंधीचा असेल तर, सहा महिन्यांहून कमी असणार नाही पण सहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडासही असा गुन्हा पात्र होईल :

परंतु आणखी असे की, पूर्वगामी परंतुकात नमूद केलेल्या स्वरूपाच्या दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर केलेल्या गुन्ह्याच्या बाबतीत, कारावासाची मुदत एक वर्षाहून कमी असणार नाही आणि द्रव्यदंडाची रक्कम एक हजार रुपयांहून कमी असणार नाही.

(२) जेव्हा एखादी व्यक्ती या अधिनियमाविरुद्ध गुन्हा केल्याबद्दल दोषी ठरली असेल तेव्हा, गुन्ह्याची संपरीक्षा करणारे न्यायालय, ज्याच्याबाबत गुन्हा घडला असा कोणताही बंदिस्त प्राणी, वन्य प्राणी, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक, आणि उक्त गुन्हा करताना वापरलेला कोणताही सापळा, अवजार, वाहन, जलयान किंवा हत्यार समपहृत करून राज्य शासनाकडे जमा करावे आणि या अधिनियमाच्या उपबंधांखाली अशा व्यक्तीने धारण केलेले कोणतेही लायसन किंवा परवाना रद्द करावा असा आदेश देऊ शकेल.

(३) लायसन किंवा परवाना याप्रमाणे रद्द करणे किंवा त्याचे समपहरण करणे हे अशा गुन्ह्याबद्दल अन्य जी कोणतीही शिक्षा देण्यात येईल तिच्या व्यतिरिक्त असेल.

(४) जेव्हा एखादी व्यक्ती या अधिनियमाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आली असेल तेव्हा, ज्या शस्त्राने या अधिनियमाविरुद्ध गुन्हा करण्यात आला असे कोणतेही शस्त्र कब्जात बाळगण्यासाठी 'शस्त्र अधिनियम, १९५९' (१९५९ चा ५४) याखाली अशा व्यक्तीस कोणतेही लायसन दिलेले असल्यास ते रद्द केले जावे आणि अशी व्यक्ती दोषसिद्धीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत 'शस्त्र अधिनियम, १९५९' (१९५९ चा ५४) याखाली लायसन मिळण्यास पात्र असू नये असे न्यायालय निदेशित करू शकेल.

**प्रयत्न व अपप्रेरण.**

५२. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्याचा प्रयत्न करील अथवा व्यतिक्रमण केले जाण्यास अपप्रेरणा देईल तिने, प्रकरणपरत्वे, त्या उपबंधाचे किंवा नियमाचे किंवा आदेशाचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानले जाईल.

**अभिग्रहणाबद्दल शिक्षा.**

५३. या अधिनियमाखालील शक्तींचा वापर करताना त्रास देण्याच्या हेतूने व विनाकारण जर एखाद्या व्यक्तीने अन्य कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता कलम ५० मध्ये नमूद केलेल्या कारणांस्तव अभिग्रहण करण्याचे निमित्त करून अभिग्रहण केली तर, दोषसिद्धीअंती ती व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**गुन्हे आपसात मिटवण्याची शक्ती.**

५४. (१) राज्य शासन अधिसूचनेद्वारे मुख्य वन्य जीव रक्षकास किंवा उप वन संरक्षकाहून कनिष्ठ दर्जाचा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास,——

(क) ज्या व्यक्तीने या अधिनियमाविरुद्ध गुन्हा केला असल्याचा वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून तिने जो गुन्हा केल्याचा संशय असेल त्याच्याबाबत तोड म्हणून काही पैशांची रक्कम स्वीकारण्याची; आणि

(ख) जेव्हा समपहरणास पात्र म्हणून कोणतीही मालमत्ता अभिग्रहण केलेली असेल तेव्हा, अशा अधिकाऱ्याने अंदाजिल्याप्रमाणे तेवढे मूल्य भरण्यात आल्यावर ती मुक्त करण्याची,

शक्ती प्रदान करू शकेल.

(२) अशा अधिकाऱ्याकडे अशी रक्कम किंवा असे मूल्य किंवा, प्रकरणपरत्वे, दोन्ही भरण्यात आल्यावर संशयित व्यक्ती जर हवालतीत असेल तर, तिला मुक्त करण्यात येईल आणि शासकीय मालमत्तेहून अन्य कोणतीही मालमत्ता अभिग्रहण केलेली असल्यास ती मुक्त करण्यात येईल आणि त्या गुन्ह्याबाबत आणखी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

(३) कोणताही गुन्हा आपसात मिटवणारा अधिकारी आदेशाद्वारे या अधिनियमाखाली गुन्हेगाराला मंजूर केलेले कोणतेही लायसन किंवा परवाना रद्द करण्याचा आदेश देऊ शकेल किंवा जर त्याला तसे करण्याची शक्ती नसेल तर, असे लायसन किंवा परवाना रद्द करण्यासाठी ज्याला ती शक्ती असेल त्या अधिकाऱ्याकडे तो जाऊ शकेल.

(४) पोटकलम (१) च्या खंड (ख) खाली तोड म्हणून स्वीकारलेली किंवा स्वीकारण्याचे कबूल केलेली कोणतीही रक्कम, काही झाले तरी, दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, ज्यासाठी कलम ५१ च्या पोटकलम (१) मध्ये किमान मुदतीचा कारावास विहित केलेला असेल असा कोणताही गुन्हा आपसात मिटवला जाणार नाही.

**गुन्ह्यांची दखल घेणे.**

५५. मुख्य वन्य जीव रक्षकाकडून किंवा राज्य शासन यासंबंधात प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडून तक्रार आल्याखेरीज कोणतेही न्यायालय या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या कोणत्याही गुन्ह्याची दखल घेणार नाही.

**इतर कायद्यांच्या प्रवर्तनास आडकाठी नाही.**

५६. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीवर, जी कोणतीही कृती किंवा अकृती या अधिनियमाविरुद्ध गुन्हा ठरते ती केल्याबद्दल, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली खटला भरला जाण्यास अथवा या अधिनियमाद्वारे उपबंधित केलेल्यापेक्षा अन्य कोणत्याही कायद्याखाली अधिक मोठ्या शिक्षेला किंवा दंडाला ती पात्र होण्यास प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस एकाच गुन्ह्याबद्दल दोनदा शिक्षा दिली जाणार नाही.

५७. या अधिनियमाविरुद्ध झालेल्या गुन्ह्याबद्दलच्या कोणत्याही खटल्यात जर, एखाद्या व्यक्तीच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली कोणताही बंदिस्त प्राणी, प्राणिजन्य वस्तू, सागुती, शिकार-स्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक असल्याचे शाबीत झाले तर, अशा व्यक्तीकडे असा बंदिस्त प्राणी, प्राणिजन्य वस्तू, सागुती, शिकारस्मारक किंवा अप्रसाधित शिकारस्मारक यांचा अवैध कब्जा, अभिरक्षा किंवा नियंत्रण आहे ही गोष्ट, विरुद्ध शाबीत होईतोपर्यंत गृहीत धरली जाईल आणि विरुद्ध शाबीत करण्याचा भार आरोपीवर राहील. विवक्षित प्रकरणी गृहीत धरावयाची गोष्ट.

५८. (१) जर या अधिनियमाविरुद्ध घडलेला कोणताही गुन्हा कंपनीने केला असेल तर, गुन्हा घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल जी व्यक्ती कंपनीची हुकूमतदार किंवा तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच ती कंपनी गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्या-विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा मिळण्यास ती पात्र होईल: कंपन्यांनी केलेले गुन्हे.

परंतु, जर अशा व्यक्तीने गुन्हा आपल्या नकळत घडून आला किंवा असा गुन्हा घडू नये यासाठी आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती हे शाबीत केले तर, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही असले तरी, जर या अधिनियमाविरुद्ध घडलेला कोणताही गुन्हा कंपनीने केलेला असेल आणि तो गुन्हा कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने घडला होता किंवा त्यानी केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हादेखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तदनुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय असा आहे आणि त्यात, पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

५९. २ ऱ्या प्रकरणामध्ये निर्देशिलेला प्रत्येक अधिकारी आणि या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्यांपैकी कोणतीही शक्ती वापरणारा कोणताही अधिकारी 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. अधिकारी हे लोक सेवक असणे.

६०. (१) या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र शासनाचा किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी याच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

(२) या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा त्याच्या अधिकाऱ्यांपैकी किंवा कर्मचाऱ्यांपैकी कोणीही यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

६१. (१) जर केंद्र शासनाच्या मते तसे करणे समयोचित असेल तर, त्यास अधिसूचनेद्वारे कोणत्याही अनुसूचीत कोणतीही नोंद जादा दाखल करता येईल अथवा अनुसूचीच्या एका भागातील कोणतीही नोंद त्याच अनुसूचीच्या दुसऱ्या भागात किंवा एका अनुसूचीतून दुसऱ्या अनुसूचीत वर्ग करता येईल. अनुसूचीतील नोंदी बदलण्याची शक्ती.

(२) जर राज्य शासनाच्या मते तसे करणे समयोचित असेल तर, त्यास अधिसूचनेद्वारे अनुसूची २री, अनुसूची ३ री, अनुसूची ४थी किंवा अनुसूची ५ वी यामधील कोणतीही नोंद १ ल्या अनुसूची-मध्ये वर्ग करता येईल आणि २ ऱ्या अनुसूचीचा २ रा भाग किंवा अनुसूची ३ री, अनुसूची ४थी किंवा अनुसूची ५ वी यांमधील कोणतीही नोंद अन्य अनुसूचीत वर्ग करता येईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील अधिसूचना निघाल्यावर संबद्ध अनुसूची त्याप्रमाणे बदलण्यात आली असल्याचे मानले जाईल,—मात्र असा प्रत्येक फेरबदल अशा फेरबदलापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीस बाध आणणार नाही.

(४) जर पोटकलम (२) खाली राज्य शासनाने कोणत्याही अनुसूचीत केलेला कोणताही फेरबदल पोटकलम (१) खाली केंद्र शासनाने तीत केलेल्या कोणत्याही फेरबदलाला प्रतिकूल असेल तर, केंद्र शासनाने केलेला फेरबदल—मग तो राज्य शासनाने अधिसूचना काढण्यापूर्वी केलेला असो वा नंतर केलेला असो—अधिक प्रभावी होईल आणि राज्य शासनाने केलेला फेरबदल प्रतिकूलतेच्या व्याप्तीपर्यंत शून्य ठरेल :

परंतु, राज्य शासनाने केलेला असा कोणताही फेरबदल, जर तो केंद्र शासनाच्या पूर्वसंमतीने केलेला असेल तर, त्या राज्यात प्रभावी होईल :

परंतु आणखी असे की, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही फेरबदलात बदल करण्यास किंवा तो रद्द करण्यास केंद्र शासनाला पूर्वगामी परंतुकातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

विवक्षित वन्य प्राणी हे उपद्रवी जीव असल्याचे घोषित करणे.

६२. कलम ६१ च्या उपबंधांच्या अधीनतेने, राज्य शासनास अधिसूचनेद्वारे १ ल्या अनुसूचीमध्ये किंवा २ऱ्या अनुसूचीच्या २ऱ्या भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांहून अन्य कोणताही वन्य प्राणी हा उपद्रवी जीव असल्याचे कोणत्याही क्षेत्रापुरते व अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपुरते घोषित करता येईल आणि अशी अधिसूचना अंमलात असेतोवर असा वन्य प्राणी ५ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असल्याचे मानले जाईल.

केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

६३. (१) केंद्र शासनास, अधिसूचनेद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी नियम करता येतील, ती प्रयोजने अशी :—

(क्) कलम ४४-पोटकलम (२) या खाली कोणत्या नमुन्यात अधिकथन करावे लागेल;

(ख्) कलम ३८-खंड (ख्) मध्ये निर्देशिलेले संव्यवहार कोणत्या अटींनी व शर्तींनी नियंत्रित होतील;

(ग्) कलम ६४-पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी केंद्र शासनाने घोषित केलेली अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यांच्याशी संबंधित असतील तेथवर त्या बाबी.

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवण्यात येईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवण्यात आला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे, किंवा, शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

६४. (१) कलम ६३ च्या कक्षेत ज्या बाबी येत नाहीत त्यांच्याबाबत या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनास अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या बाबी अशा :—

(क्) कलम ६ पोटकलम (१)-खंड (ग्) मध्ये निर्देशिलेल्या मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्यातील रिक्त पदे भरण्याची रीत;

(ख्) कलम ६-पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेले भत्ते;

(ग्) या अधिनियमाच्या उपबंधांखाली केला जाणारा, मंजूर केला जाणारा किंवा सादर केला जाणारा कोणताही अर्ज, प्रमाणपत्र, हक्कमागणी , अधिकथन, लायसन, परवाना, नोंदणी, प्रतिवेदन किंवा अन्य दस्तऐवज यासाठी वापरावयाचे नमुने आणि त्याकरता लागत असल्यास फी;

(घ्) ज्यांच्या अधीनतेने या अधिनियमाखाली कोणतेही लायसन किंवा परवाना मंजूर करता येईल त्या शर्ती;

(ङ्) (पकडलेल्या किंवा हत्या केलेल्या) वन्य प्राण्यांच्या ज्या नोंदी लायसनधारकाने ठेवावयाच्या आणि सादर करावयाच्या त्यांचा तपशील;

(च्) बंदिस्त प्राणी, सागुती, प्राणिजन्य वस्तू, शिकारस्मारके व अप्रसाधित शिकारस्मारके कब्जात ठेवण्याबाबत, हस्तांतरित करण्याबाबत व विकण्याबाबत विनियमन;

(छ्) चर्मपूरणाचे विनियमन;

(ज्) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

अनुसूचित जनजातींच्या अधिकारांचे संरक्षण करणे.

६५. दिनांक २८ एप्रिल, १९६७ रोजीच्या अंदमान व निकोबार राजपत्राच्या असाधारण अंकात १ ते ५ या पृष्ठांवर प्रकाशित झालेली दिनांक २८ एप्रिल, १९६७ रोजीची अंदमान व निकोबार प्रशासनाची अधिसूचना क्रमांक ४०–६७-एफ, क. जी ६३५-खंड तीन याद्वारे अंदमान व निकोबार बेटे या संघ राज्यक्षेत्रातील निकोबार बेटांवरील अनुसूचित जनजातींना प्रदान केलेल्या मृगयेच्या अधिकारांवर या अधिनियमातील कोणतीही गोष्ट परिणाम करणार नाही.

६६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभी व तेव्हापासून या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीचा व राज्यात अंमलात असलेला अन्य प्रत्येक अधिनियम, किंवा त्यात अंतर्भूत असलेला कोणताही उपबंध जेथवर या अधिनियमाशी किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही उपबंधाशी समनुरूप असेल किंवा त्याला प्रतिकूल असेल तेवढया व्याप्तीपर्यंत तो निरसित ठरेल: निरसने व व्यावृत्ती.

परंतु, अशा निरसनामुळे,--

(एक) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या पूर्व प्रवर्तनावर अथवा त्याखाली रीतसर केलेल्या किंवा साहिलेल्या कोणत्याही गोष्टीवर परिणाम होणार नाही;

(दोन) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाखाली संपादिलेला किंवा उपार्जित झालेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार, अथवा ओढवलेले आबंधन किंवा दायित्व यावर परिणाम होणार नाही;

(तीन) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या कोणत्याही गुन्ह्याबाबत ओढवलेला दंड, समपहरण किंवा शिक्षा यांवर परिणाम होणार नाही; अथवा

(चार) पूर्वोक्त असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, दंड, समपहरण किंवा शिक्षा यासंबंधीचे कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही किंवा उपाय यावर परिणाम होणार नाही;

आणि जणु काही पूर्वोक्त अधिनियम निरसित करण्यात आलेला नसावा त्याप्रमाणे असे कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही किंवा उपाय सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा बजावता येईल आणि असा कोणताही दंड, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल.

(२) असे निरसन झाले असले तरीही,--

(क्) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाखाली (काढलेली कोणतीही अधिसूचना, आदेश, दिलेले प्रमाणपत्र, नोटीस किंवा पावती अथवा केलेला अर्ज अथवा मंजूर केलेला परवाना यासुद्धा) केलेली व या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, जणु काही अशी गोष्ट किंवा कारवाई केली गेली त्यावेळी हा अधिनियम अंमलात असावा त्याप्रमाणे या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधांखाली केली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा कारवाईमुळे ती निष्प्रभावी झाली नाही तर व तोपर्यंत ती अंमलात असण्याचे चालू राहील;

(ख्) याप्रमाणे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली मंजूर केलेले व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही लायसन या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधांखाली मंजूर केले असल्याचे मानले जाईल आणि जितक्या कालावधीसाठी असे लायसन मंजूर केले होते त्यापैकी राहिलेल्या मुदतीपुरते ते, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोटकलम (१) खाली निरसित झालेल्या अधिनियमान्वये राज्य शासनाने घोषित केलेले कोणतेही अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यान हे राज्य शासनाने या अधिनियमान्वये घोषित केलेले अभयारण्य किंवा, प्रकरणपरत्वे, राष्ट्रीय उद्यान असल्याचे मानले जाईल आणि जर या अधिनियमाच्या प्रारंभी किंवा प्रारंभापूर्वी अशा कोणत्याही राष्ट्रीय उद्यानात असलेल्या जमिनीतील किंवा जमिनीवरील एखादा अधिकार उक्त अधिनियमान्वये विलोपित झाला नसेल तर, त्या अधिकाराचे विलोपन या अधिनियमाच्या उपबंधांनुसार करण्यात येईल.

## अनुसूची १ ली

(कलमे २, ८, ९, ११, ४०, ४१, ४३, ४८, ५१, ६१ व ६२ पहा)

### भाग १ ला : सस्तन प्राणी

| | |
|---|---|
| [3][ 1. Andaman Wild Pig (Sus andamanensis).] | [३][ १. अंदमानी रान डुक्कर. ] |
| [3][ 1A. ] Binturong (Arctictis binturong). | [३][ १क. ] बिंटुरांग, बिडाल. |
| 2. Black buck (Antelope cervicapra). | २. काळा बामण्या, बोरकी. |
| [1][ 2A. Blue whale (Balaenoptera musculus). ] | [१][ २क. निळा देवमासा. ] |
| 3. Brow-antlered deer or Thamin (Cervus eldi). | ३. भारशिंगी हरीण. |
| [4][ 3A. Capped Langur (Presbytis pileatus). ] | [४][ ३क. शिखी वानर. ] |
| 4. Caracal (Felis caracal). | ४. रानमांजर. |
| 5. Cheetah (Acinonyx jubatus). | ५. चित्ता. |
| [1][ 5A. Chinese pangolin (Manis pentadactyla). ] | [१][ ५क. चिनी वज्रकीट, चिनी खवळ्या मांजर. ] |
| [5][ 5B. Chinkara or Indian Gazelle (Gazella gazella bennetti). ] | [५][ ५ख. चिंकारा. ] |
| 6. Clouded leopard (Neofelis nebulosa). | ६. चित्रक. |
| [6][ 6A. Desert cat (Felis libyca). ] | [६][ ६क. वाळवंटी बिडाल. ] |
| 7. Dugong (Dugong dugon). | ७. डुगांग, हस्तिमकर. |
| 8. Fishing cat (Felis viverrina). | ८. मासेमार बिडाल. |
| [7][ 8A. Four-horned antelope (Tetraceros quadricornis). ] | [७][ ८क. चौशिंगा. ] |
| [7][ 8B. Dolphins (Dolphinus, delphis, Platanista gangetica). ] | [७][ ८ख. डॉलफिन, शिशुमार. ] |
| [7][ 8C. Flying squirrels (All species of the genus Hylopetes, Petaurista, Belomys and Eupetaurus). ] | [७][ ८ग. उडत्या खारी. ] |
| 9. Golden cat (Felis temmincki). | ९. सोनेरी बिडाल. |
| 10. Golden langur (Presbytis geei). | १०. सोनेरी वानर. |
| [8][ 10A. Himalayan thar (Hemitragus Jemlahicus). ] | [८][ १०क. हिमालयीन थार.] |
| 11. Hispid hare (Caprolagus hispidus). | ११. काटेरी ससा. |
| 12. Hoolock (Hylobates hoolock). | १२. हुलूक. |
| [1][ 12A. Humpbacked whale (Megaptera, novaeangliae). ] | [१][ १२क. कुबडा देवमासा. ] |
| [9][ 12B. Indian Elephant (Elephas maximus).] | [९][ १२ख. भारतीय हत्ती. ] |
| 13. Indian lion (Panthera leo persica). | १३. भारतीय सिंह. |
| 14. Indian Wild Ass (Equus hemionus khur). | १४. भारतीय रानगाढव. |
| [2][ 15. Indian Wolf (Canis lupus pallipes). ] | [२][ १५. भारतीय लांडगा. ] |
| 16. Kashmir Stag (Cervus elaphus hanglu). | १६. काश्मिरी काळवीट. |
| [10][ 16A. Leopard or Panther (Panthera pardus). ] | [१०][ १६क. डहाण्या वाघ, बिबळ्या वाघ. ] |
| 17. Leopard cat (Felis bengalensis). | १७. वाघाटी. |
| 18. Lesser or Red panda (Ailurus fulgens). | १८. लहाना किंवा लाल पंडा. |
| 19. Lion-tailed macaque (Macaca silenus). | १९. गोंडेदार शेपटीचे माकड. |
| 20. Loris (Loris tardigradus). | २०. सडपातळ लेमूर. |
| 21. Lynx (Felis lynx isabellinus). | २१. हलीक्षण. |
| 22. Malabar Civet (Viverra megaspila). | २२. मलबारी जवादी बिडाल. |

[ कृ. मा. प. ]

तळटीपा—पृष्ठ २२

१. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक २९ ऑगस्ट, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे घातले.

२. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक २९ ऑगस्ट, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मूळ नोंद क्रमांक १ याला '१ क' असा नवीन क्रमांक दिला व तत्पूर्वी ३ ऱ्या अनुसूची मधील नोंद क्रमांक १ स्थानांतरित करून ती अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक १ म्हणून घातली.

४. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अनुसूची २ री-भाग १ ला यामधील नोंद क्रमांक ४ ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक ३क म्हणून स्थानांतरित केली.

५. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ३ ऱ्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक ४ ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक ५ख म्हणून स्थानांतरित केली.

६. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ४ थ्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक १ ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक ६क म्हणून स्थानांतरित केली.

७. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ३ ऱ्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक ६ आणि २ ऱ्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक ६ व ८ या नोंदी, अनुसूची १ ली-भाग १ ला यांमध्ये नोंद क्रमांक ८क, ८ख व ८ग म्हणून स्थानांतरित केल्या.

८. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ३ ऱ्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक १० ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक १० क म्हणून स्थानांतरित केली.

९. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अनुसूची २ री-भाग १ ला यामधील नोंद क्रमांक १३ ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक १२ ख म्हणून स्थानांतरित केली.

१०. कृषि व सिंचन मंत्रालय, भारत सरकार, यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर, १९७७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अनुसूची २ री-भाग २ रा यामधील नोंद क्रमांक १ ही, अनुसूची १ ली-भाग १ ला यामध्ये नोंद क्रमांक १६ क म्हणून स्थानांतरित केली.

| | |
|---|---|
| [3][ 22A. Malay or Sun bear (Helarctos malayanus). ] | [3][ २२क. मलायी अस्वल. ] |
| 23. Marbled cat (Felis Marmorata). | २३. आरसपानी बिडाल. |
| 24. Markhor (Capra falconeri). | २४. मारखोर. |
| [4][ 24A. Mouse deer (Tragulus mininna). ] | [4][ २४क. पिसोरा. ] |
| 25. Musk deer (Moschus moschiferus). | २५. कस्तुरीमृग. |
| [5][ 25A. Nilgiri Thar (Hemitragus hylocrius). ] | [5][ २५क. निलगिरी थार. ] |
| 26. Ovis Ammon or Nyan (Ovis ammon hodgsoni). | २६. एडका. |
| 27. Pallas's cat (Felis manul). | २७. मानल, लघुकर्ण बिडाल. |
| 28. Pangolin (Manis crassicaudata). | २८. वज्रकीट, खवलेचा मांजर. |
| 29. Pygmy hog (Sus salvanius). | २९. झेंडू. |
| 30. Rhinoceros (Rhinoceros unicornis). | ३०. गेंडा. |
| 31. Rusty spotted cat (Felis rubiginosa). | ३१. तांबूस ठिपकेदार बिडाल. |
| [6][ 31A. Serow (Capricornis sumatraensis). ] | [6][ ३१क. सेरो. ] |
| [7][ 31B. Sloth bear (Melursus ursinus). ] | [7][ ३१ख. अस्वल. ] |
| 32. Slow Loris (Nycticebus coucang). | ३२. स्थूल लेमूर. |
| 33. Snow leopard (Panthera uncia). | ३३. हिमवाघाटी. |
| 34. Spotted linsang (Prionodon pardicolor). | ३४. ठिपकेदार लिनसांग. |
| 35. Swamp deer (all sub-species of Cervus duvauceli). | ३५. बारशिंगा. |
| 36. Takin or Mishmi Takin (Budorcas taxicolor). | ३६. गवाज. |
| [8][ 36A. Tibetan Antelope or Chiru (Panthelops hodgsoni). ] | [8][ ३६क. तिबेटी सारंग, चिरू. ] |
| 37. Tibetan Gazelle (Procapra picticaudata). | ३७. तिबेटी गजाल. |
